DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

**पुस्तकवादी नेते व्हावेत**

>>अग्रलेख / 5

**जिल्ह्याची तहान वाढण्यापूर्वीच धरणे पूर्ण करा- जलसंपदा मंत्री**

>>पान 3

**ठाण्यातील सर्व प्रभागात कोरोनाचे एक आकडी रुग्ण**

>>पान 3

भारतीय सौर दिनांक कार्तिक ४ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ६० | मंगळवार २६ ऑक्टोबर २०२१ | पाने ८ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ









# MANGO FOR ALL SEASONS !




Founder Pravin Chheda along with the young Turks Sitanshu Chheda and Mahesh Chheda.

In India, the month of May is synonymous to Mangoes and while we all are enjoying the season of the king of fruits to the core, there is another Mango, which is available across the year, bringing smiles to our faces.

Mango, the world class stationery brand was born in 2004 and since then has completely transformed the conventional stationery retail experience. Pravin Chheda and his brother were the pioneers of Mango, which has become a household name in Thane and Navi Mumbai with two stores in each of the cities. Having been around in the retail industry for over three decades, Chheda is well-known for his brands like Hastakala, Silkline, Cotton Bazaar, among many. With Mango, the enterprising retailer added one more feather to his hat and enhanced his existing repertoire. Around four years back, Pravin's son Sitanshu joined the family business, determined to take his father's legacy forward.

Sitanshu, who has a penchant for stationery, avers, "Stationery business was not that big in India. A typical stationery shop would have pens, pencils, erasers, sharpeners, and that would be it. However, my father, who is a globetrotter, saw a dream to change the stationery landscape of the city. During one of his business trips to Thailand, he came across a Japanese stationery brand 'Loft'. It is a very big brand in Japan and has an eight storeyed building in Tokyo. Unlike India, the definition of stationery is very broad overseas. Inspired by 'Loft' my father decided to start something similar in Thane. This is how Mango was started to offer a classic stationery retail experience."

Be it the name or the wide avalanche of quality products that it houses, Mango stands apart from its peers. The Chheda scion states, "While my father was thinking about the brand name, he simply happened to consult one of his photographer friends. That friend posed one simply question to my father, 'What is the one thing that you like the most?' My father quite naively said, 'Mango' and this is how the name 'Mango' was fixed. "

**Expressing about his future plans, the young businessman says, "We would like to start a few more stores in the MMR (Mumbai Metropolitan Region) and then have a presence in Gujarat. Apart from this, somewhere down the line, we would look to go into manufacturing."**




Sitanshu adds, "Mango is a small name, easy to recall, and ofcourse most of the people love it. Also the colour yellow is a sign of prosperity and happiness." Speaking about colour, the Mango store is an epitome of beauty and elegance, thanks to the extravagant range of colourful products it offers. There are over 20,000 different products which the customers can choose from.

He opines, "Shopping is a therapeutic experience. When it comes to something like stationery products, which are full of vibrant colours, the shoppers simply tend to forget everything and get immersed in the joy of buying. We at Mango ensure that we offer the best stationery retail experience to our clients by letting them touch and feel the products and just let them be by themselves during their visit."

The budding entrepreneur, who wants to spread joy with stationery believes, "Art is essential for all of us. Art can be anything from drawing to singing to pottery. Any art works wonders. It helps you to not only be calm but also connect with your inner self. For adults, it certainly reduces anxiety and stress, while for children, it aids in developing their cognitive skills, creativity and motor skills." Mango hosts different workshops to cultivate different arts among people. People from varied age groups join these workshops and by the end of it they not only learn new things but also bring about a positive change in their personalities.




Over the years, Mango is known to embrace innovations with open arms, whether it is computerized inventory management or the use of ERP for its daily functioning. Recently, it introduced "the yellow box". Sitanshu describes, "The yellow box is an ultimate art, craft, stationery and lifestyle subscription box. It is a surprise box specially designed to ignite customers' creativity. It contains a bunch of delightful goodies and other little surprises. It is delivered to the doorstep and at present has three subscription options; three months, six months and 12 months."

Expressing about his future plans, the young businessman says, "We would like to start a few more stores in the MMR (Mumbai Metropolitan Region) and then have a presence in Gujarat. Apart from this, somewhere down the line, we would look to go into manufacturing."

From being the first in the market to letting customers inside the store shop for their favourite school, college and office essentials to delivering the accessories online, Mango has redefined the stationery business. There is seldom any doubt that the brand totally stands by its tagline "Makes my day."

Before signing off, Sitanshu Chheda gives a humble message to the upcoming businessmen, "Keep trying different things. You never know what will work. Don't fall in love with your idea. Be humble enough to realize your mistakes. Surround yourself with people from whom you can learn. And finally, invest in good people because in your business, you are not expected to do everything on your own."


**There are over 20,000 different products which the customers can choose from.**



**Before signing off, Sitanshu Chheda gives a humble message to the upcoming businessmen, "Keep trying different things. You never know what will work. Don't fall in love with your idea. Be humble enough to realize your mistakes. Surround yourself with people from whom you can learn. And finally, invest in good people because in your business, you are not expected to do everything on your own."**













**MANGO STATIONERY**
**Gokhale road (Thane) | Viviana Mall (Thane)**
**Grand Central mall (Seawoods)**
**022-67484334 | www.mangostationery.com**



## शहापूरात वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांविरुद्ध महावितरणाची कारवाई

**शहापूर :** वीज चोरी करणाऱ्या ग्राहकां विरुद्ध महावितरणनी धडक कारवाई केली असून तालुक्यातील आटगाव, वासिंद येथील 256 घरांच्या तपासणीत वीज चोरी करणाऱ्या 26 घरांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. यामध्ये आटगाव ग्रामपंचायतीचा फिल्टरेशन प्लांट असून वीज चोरी करणाऱ्या 26 ग्राहकांनी तब्बल 14 लाखाची सुमारे 72 हजार युनिट ची वीज चोरी भरारी पथकाने पकडली आहे. या ग्राहकांना वीज देयके वितरित करण्यात आली असून ग्राहकांनी दिलेल्या मुदतीत रक्कम न भरल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

तालुक्यातील बेकायदेशीर वीज चोरी करणाऱ्यांवर महावितरण लक्ष ठेऊन असल्याचे दिसून येत आहे. महावितरणचे शहापूर उपविभागाचे उप कार्यकारी अभियंता अविनाश कटकवार यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या भरारी पथकाचे धाडसत्र सुरु असून शहापूर तालुक्यातील विविध गावातील घरांची, दुकानांची तपासणी करून वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. चार दिवसांपूर्वी तालुक्यातील आटगाव, लाहे, वासिंद, खातीवली येथील 256 घरांची तपासणी करण्यात आली. त्यातील आटगाव व वासिंद येथील एकूण 26 घरांमध्ये बेकायदेशीर वीज पुरवठा सुरु असल्याचे भरारी पथकाच्या निदर्शनास आले.

आटगाव ग्रामपंचायतीच्या फिल्टरेशन प्लांट साठी देखील वीज चोरी करण्यात आली असल्याचे भरारी पथकाने टाकलेल्या धाडीत समोर आले आहे. या वीज चोरट्यांनी तब्बल 72 हजार 445 युनिट ची तेरा लाख 63 हजार रुपयांची वीज चोरी केली असल्याचे उघड झाले आहे. या वीज चोरणाऱ्या ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला असून दिलेल्या मुदतीत वीज देयकाची रक्कम न भरल्यास वीज चोरी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे शहापुर महावितरणचे उप कार्यकारी अभियंता अविनाश कटकवार यांनी सांगितले.

# शालेय बस संघटनांची दरवाढीची मागणी, मागण्या पूर्ण होईपर्यंत बससेवा बंद

**ठाणे :** करोनाचा संसर्ग आटोक्यात येत असल्याने शाळा पुन्हा सुरु झाल्या असल्या तरी विद्यार्थ्यांना करोनाची लागण होऊ नये म्हणून शासनाने नियमावली आखून दिली आहे. शालेय बसमध्ये केवळ 50 टक्केच विद्यार्थ्यांना नेता येणार आहे. इंधनाचे वाढलेले भाव आणि त्या तुलनेत कमी प्रवासी वाहतुकीचे निर्बंध असल्याने शालेय बस संघटनांनी दरवाढीची मागणी केली आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत बससेवा बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे संघटनेतर्फे सांगण्यात आले. पूर्ण क्षमतेने विद्यार्थी वाहतुकीला परवानगी देण्यात यावी, अन्यथा 40 टक्क्यांनी दरवाढीची मागणी जिल्हा बसमालक संघटनेतर्फे करण्यात येत आहे. या मागण्या पूर्ण होईपर्यंत काही बसचालकांनी प्रवासी सेवा देण्यात येणार नाही, असा निर्णय घेतला आहे, तर काहींनी छुप्या पद्धतीने बस दरवाढ लागू केल्याने पालकांवर अतिरिक्त बोजा



### पालकांना आर्थिक भुर्दंड

**विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी पालक काही छोट्या आणि खाजगी गाड्यांच्या पर्याय स्वीकारतात. हे छोटे गाडी मालक त्यांच्या गाडीच्या क्षमतेनुसार 10 ते 15 विद्यार्थ्यांची वाहतूक करतात. या वाहनांच्या मालकांनी त्यांच्या दरात 30 ते 40 टक्क्यांनी वाढ केली आहे. एकीकडे बस बंद आणि दुसरीकडे लहान वाहनांनी केलेली दरवाढ यांमुळे पालकवर्ग कोंडीत सापडला आहे.**

पडू लागला आहे.

करोनाची दुसरी लाट ओसरु लागल्याने मागील दीड वर्षांपासून बंद असलेल्या शाळा 15 दिवसांपूर्वी पुन्हा सुरु झाल्या आहेत. मात्र शासनाने त्यासाठी नियमावली तयार केली आहे. जे विद्यार्थी शाळेत बसने जाणार आहेत, ते एका आसनावर एकच विद्यार्थी अशा पद्धतीने प्रवास करतील. यासंबंधी पालकांनी आणि वाहनचालकांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसमध्ये केवळ 50 टक्के क्षमतेनेच वाहतूक करावी लागणार आहे. शाळा सुरु झाल्याने अर्थचक्र रुळावर येईल, अशी आशा सर्व बसमालकांना होती. संपूर्ण क्षमतेने विद्यार्थी वाहतुकीला परवानगी मिळाली नसल्याने बसमालकांचा हिरमोड झाला आहे. बस सुरु केल्या तर विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी अधिकच्या फेऱ्या माराव्या लागणार आहेत. त्यात मागील काही महिन्यांपासून इंधनाच्या दरात वाढ होत आहे. अधिकच्या फेऱ्या आणि इंधनाच्या दरात झालेली भरमसाठ वाढ यांमुळे सध्या शालेय बस चालविणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे बसमालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पूर्ण क्षमतेने विद्यार्थी वाहतुकीला परवानगी आणि 40 टक्क्यांनी दरवाढ होत नाही तोपर्यंत शालेय बस चालविणार नसल्याचा पवित्रा या संघटनांनी घेतला आहे.

## उल्हासनगरातील शैक्षणिक संस्थांची अग्निसुरक्षा वाऱ्यावर

**उल्हासनगर :** उल्हासनगर शहरात असलेल्या 222 शाळांपैकी फक्त 13 शैक्षणिक संस्थांकडेच फायर एनओसी असल्याची धक्कादायक बाब मनविसेनं माहितीच्या अधिकारात उघड केली आहे. त्यामुळे शहरातील हजारो विद्यार्थ्यांवर आगीचं संकट घोंघावत असल्याचं समोर आलं आहे. उल्हासनगर शहराची विभागणी 5 कॅम्पसमध्ये झालेली असून शहरातील या 5 कॅम्पमध्ये मिळून एकूण 222 शाळा-महाविद्यालये आहेत. यापैकी फक्त 13 शाळा आणि महाविद्यालयांनी अग्निशमन विभागाकडून फायर एनओसी मिळवली आहे. तर उर्वरित 209 शैक्षणिक संस्थांची अग्निसुरक्षा वाऱ्यावर असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

मनसेच्या विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष मनोज शेलार यांनी माहितीच्या अधिकारात याबाबतची माहिती मागवली होती. त्याला अग्निशमन विभागाने दिलेल्या उत्तरात ही चिंताजनक बाब उघड झाली आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे या 209 शाळा-महाविद्यालयांपैकी काही शाळा आणि महाविद्यालयं ही एखाद्या इमारतीच्या गच्चीवर किंवा बेसमेंटमध्ये आहेत. या शाळा महाविद्यालयांच्या इमारतीत इतर व्यावसायिक आस्थापना आहेत. शिवाय शाळा आणि महाविद्यालयात येण्या-जाण्यासाठी एकमेव रस्ता आहे. या रस्त्यामध्ये उघड्या पडलेल्या वायर्स आणि अरुंद जागा आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी फायर एक्झिट नसल्याने आग लागली, तर हजारो विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येण्याची भीती व्यक्त होतेय. त्यामुळे या शाळा, तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून येत्या 15 दिवसात फायर एनओसी मिळवावी, अन्यथा सुरक्षित जागेत स्थलांतर करावं, अशी मागणी मनविसे शहराध्यक्ष मनोज शेलार यांनी केली आहे.

## झेप प्रतिष्ठानकडून आदीवासी पाड्यातील विद्यार्थ्यांना पुस्तक दान

**ठाणे :** वाचनाची आवड असूनही परिस्थितीअभावी पुस्तक खरेदी न करु शकणाऱ्या आदीवासी पाड्यातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शैक्षणिक पहाट आणण्याचा उपक्रम झेप प्रतिष्ठानने हाती घेतला आहे. मोबाईल नेटवर्क न पोहोचलेल्या गावांत पुस्तकांच्या माध्यमातून जगाशी संपर्क यावा यासाठी अवांतर वाचनाची पुस्तके देऊन झेप आदीवासीपाड्यांत 'तेजोमय' दिवाळी साजरी करणार आहे.

मोबाईल आणि सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे आजकालची पिढी पुस्तकांपासून दूर झाली आहे. एकीकडे शहरी भागात ही परिस्थिती तर दुसरीकडे ग्रामीण भागांत विशेषतः आदिवासी पाड्यांवर वाचनाची आवड असूनही पुस्तकांच्या नावाने दुष्काळच आहे. बेताच्या परिस्थितीमुळे जेमतेम शिक्षण घेता येते. शालेय पुस्तकांखेरीज अवांतर वाचनाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढणे गरजेचे असताना पुस्तकांच्या वाढलेल्या भरमसाट किमती ही पुस्तके न घेण्याचे एक कारण आहे. मोबाईल फोन नसल्यामुळे जगाशी संपर्क नाही. त्यामुळे अशा मुलांमधील वाचनाच्या आवडीला प्रोत्साहन मिळावे,



मान्यवरांची पुस्तके वाचून त्यांचा आजूबाजूच्या जगाशी संपर्क जोडला जावा, या उदात्त हेतूने झेप प्रतिष्ठानने दिवाळीच्या निमित्ताने 'तेजोमय' हा उपक्रम हाती घेतला.

गेल्यावर्षीपासून हा उपक्रम सुरु केला. शैक्षणिक पुस्तके या विद्यार्थ्यांना मिळतात. परंतू अवांतर वाचनाची पुस्तके दिल्यास त्यांच्या ज्ञानात भर पडेल आणि तेथे वाचन चळवळीला चालना मिळेल, असे झेपचे संस्थापक अध्यक्ष विकास धनवडे यांनी सांगितले. झेप प्रतिष्ठानतर्फे यावर्षीदेखील पुस्तकदान हा उपक्रम राबवला जात आहे. ज्या अंतर्गत आदिवासीपाड्यातील तसेच, शहरी भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना इंग्रजी आणि मराठी भाषेतील पुस्तके ग्रंथालयासाठी उपलब्ध करुन दिली जातात. गेल्यावर्षी जवळपास 500 पेक्षाही जास्त पुस्तके जव्हारच्या आदिवासीपाड्यांत वाटप केली होती, जिथे शिक्षक मुलांकडून ही पुस्तके वाचून घेतात. या पुस्तकदान उपक्रमांतर्गत आपल्याकडे असलेली जुनी पुस्तके रद्दीला न देता झेप प्रतिष्ठानकडे द्यावीत. ही पुस्तके अशा मुलांसाठी उपलब्ध करुन दिली जातील असे आवाहन धनवडे यांनी केले. या पुस्तकात ग्रंथ, पोथी, कॉलेज, इंजिनिअरिंग अशी पुस्तके देऊ नयेत. मराठी तसेच इंग्रजी भाषेतील पुस्तके, शब्दकोश, आत्मचरित्रे, शौर्यकथा, व्यवसाय संबंधित गोष्टी, प्रवास वर्णने अशा प्रकारची पुस्तके देता येतील. त्यासाठी इच्छुकांनी 9700712020 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन झेपने केले आहे.

## खारकोपर ते उरण रेल्वेसेवा सुरु होण्याची शक्यता

उरण : उरण ते बेलापूर या रेल्वे मार्गावरील बेलापूर ते खारकोपर मार्गावरील रेल्वेसेवा सुरु झाली आहे. मात्र खारकोपर ते उरण मार्गावरील कामे प्रलंबित असल्याने हा मार्ग अद्याप सुरु करण्यात आलेला नाही. या मार्गावरील रेल्वे स्थानकांच्या कामाला सध्या वेग आलेला दिसत आहे. लवकरच ही कामे पूर्ण होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

उरण ते बेलापूर (सीवूड्स) दरम्यान लोकल सुरु करण्याची घोषणा 1997 साली झाली होती. मात्र यातील अडथळे निर्माण झाल्याने ती लांबणीवर पडली होती. दोन वर्षांपूर्वी या मार्गावरील पहिल्या टप्प्यातील बेलापूर ते खारकोपर मार्गावर रेल्वेसेवा सुरु झाली आहे. यावेळी लवकरच पुढील सेवा सुरु करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. मात्र येथील नागरिकांनी विरोध केल्याने या मार्गावरील कामे रखडली होती. दोन महिन्यापूर्वीच जासई



परिसरातील या मार्गात येणारे अडथळे दूर करण्यासाठी सिडकोकडून कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर येथील कामांना वेग आला आहे. उरण रेल्वे स्थानकाचे काम सुरु असून ते लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. सिडको व रेल्वे विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा मार्ग तयार होत आहे.

याबाबत सिडकोच्या मुख्य जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी जासईच्या पुढील कामांची जबाबदारी ही रेल्वे विभागाची असल्याने हा मार्ग निश्चितपणे कधी सुरु होणार याची माहिती रेल्वे विभागच देऊ शकतो असे सांगितले.

## नवी मुंबई मेट्रो वेगवान; 'आरडीएसओ'कडून प्रमाणपत्र

**नवी मुंबई :** गेली अनेक वर्षे रखडलेला नवी मुंबई मेट्रो प्रकल्प अंतिम टप्प्यात असून यासाठीच्या आवश्यक तपासण्या करण्यात येत आहेत. रिसर्च डिझाइन ॲण्ड स्टॅण्डर्ड ऑर्गनायझेशनकडून (आरडीएसओ) वेगाचे अंतरिम प्रमाणपत्रही मिळाले आहे. त्यात मेट्रोचे कमाल वेगाने परिचालन करण्याची मंजुरी मिळाली आहे. आता फक्त सुरक्षा चाचणी शिल्लक असून लवकरच ही सेवा सुरु करण्यात येईल, असा विश्वास सिडकोने व्यक्त केला आहे.

सिडकोकडून नवी मुंबईतील सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण चार उन्नत (एलिव्हेटेड) मार्ग साकारण्यात येत आहेत. यातील बेलापूर ते पेंधर हा मार्ग क्रमांक एक असून तो 11 किमी लांबीचा आहे. या मार्गावर तळोजा येथे मेट्रोचे आगार आहे. भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयांतर्गत असणाऱ्या 'आरडीएसओ'



यांच्याकडून देशातील विविध रेल्वे प्रणालींमध्ये प्रमाणीकरण आणि समन्वय साधण्याची जबाबदारी असते. आरडीएसओ यांच्याकडून या मार्गावर पेंधर ते सेंट्रल पार्क स्थानकांदरम्यानच्या 5.14 किमीच्या अंतरावर मेट्रोची नुकतीच ऑसिलेशन चाचणी आणि इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स चाचणी घेण्यात आली असून ती यशस्वी ठरली आहे. प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरु करण्याच्या दृष्टीने चाचपणी म्हणून ऑसिलेशन चाचणी अत्यंत महत्त्वाची ठरते.

दरम्यान वेगवेगळ्या वजनाचा भार वाहून नेण्याची मेट्रोची क्षमता आणि इमर्जन्सी ब्रेक यांची चाचणी घेण्यात आली. तसेच सिडकोकडून रोलिंग स्टॉक, सिग्नलिंग, विद्युतपुरवठा, मार्गिका इ. मेट्रोतील प्रणालींशी संबंधित कागदपत्रे, चाचणी प्रमाणपत्रे 'आरडीएसओ'ला दिली असून त्याचीही पडताळणी करण्यात आली आहे.

या मार्गावर 'आरडीएसओ'कडून आता कमाल वेगाने मेट्रोचे परिचालन करण्याकरिता प्रमाणपत्र देण्यात आले आहे. यामुळे लवकरच या मार्गावरुन प्रवासी वाहतूक सुरु होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यानंतर लवकरच मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएमआरएस) विभागाचे आयुक्त यांच्याकडून या मार्गाचे परीक्षण करण्यात येणार आहे. त्यानंतर रेल्वे मंडळाची अंतिम मंजुरी प्राप्त केल्यानंतर पेंधर ते सेंट्रल पार्क ही मेट्रो सेवा सुरु करण्यात येणार आहे.

## प्रा. विजया पंडितराव यांच्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

**ठाणे :** प्रा. विजया पंडितराव यांच्या 'मनी-मानसी' (नाट्यसमीक्षा) आणि 'मनस्वी' (कवितासंग्रह) या दोन पुस्तकांचे प्रकाशन 17 ऑक्टोबर रोजी मुलुंड (मुंबई) येथील वि. ग. वझे महाविद्यालयाच्या सभागृहात सुप्रसिद्ध अभिनेत्री आणि लेखिका संपदा जोगळेकर कुळकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'नानी ते बनी' या नाटककार जयवंत दळवी यांच्या नाटकांतील स्त्री-व्यक्तिरेखांवर आधारित कार्यक्रमाचे अभिवाचन करण्यात आले. 'मनी- मानसी' या पुस्तकाबद्दल बोलताना डॉ. मंगला सिन्नरकर यांनी सांगितले की, 'हे नाट्यसमीक्षेचे पुस्तक असले तरी रसिकांना आनंद मिळावा यासाठी त्यात आवश्यक ते बदल करण्यात आले असून, स्त्री-व्यक्तिरेखांच्या मानसिकतेचा मागोवा उत्तम प्रकारे घेतला आहे.' तर 'मनस्वी' या कविता संग्रहाबद्दल सांगताना ज्येष्ठ समीक्षिका डॉ. प्रतिभा कणेकर यांनी कवितांमधील आशयघन प्रतिमांचा संदर्भ देत 'कवितांच्या माध्यमातून कवयित्री




स्वतःचा शोध घ्यायला लागली आहे.' असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या संपदा जोगळेकर कुळकर्णी यांनी आपले विचार व्यक्त करताना स्पष्ट केले की, 'नाटक, सिनेमा, मॉडेलिंग अशा क्षेत्रांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. पण विजयाबाईंनी मात्र गंभीरपणे नाटकांतील स्त्री-व्यक्तिरेखा अधोरेखित केल्या आहेत.' याबरोबरच त्यांनी कवयित्रीच्या दोन कविताही सादर केल्या.

'लेखिकेची दोन पुस्तके ही केवळ झलक असून आणखी बरीच पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत', असे सृजनसंवादचे प्रकाशक गीतेश शिंदे यांनी स्पष्ट केले. आपले मनोगत व्यक्त करताना, 'गेली तीस वर्षे मी फक्त लिहिते आहे आणि आज ते अक्षरधन पुस्तकरूपाने आपल्या हाती सोपवताना मला अतीव समाधान होत आहे.', अशा शब्दांत लेखिकेने आपले विचार व्यक्त केले. अशा या देखण्या सोहळ्याच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी तपस्या नेवे यांनी सहजपणे संभाळली.

# रिक्षा स्टँड हलवण्याबाबतचे नियोजन कारवाईनंतरही प्रलंबित

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपालिकेने पंधरा दिवसांपूर्वी पूर्व भागातील शिवाजी चौकात फेरीवाले आणि रस्ता अडवणूक करणाऱ्या रिक्षा स्टँडच्या बॅरिकेड्ससह संघटनेच्या कार्यालयावरही कारवाई केली होती. मात्र, अंबरनाथ, बदलापूर शहराच्या वाहतूक व्यवस्थेचे नियोजन सांभाळणाऱ्या पोलिस निरीक्षक आणि सहाय्यक पोलिस आयुक्तांची पदे गेले दीड महिना रिक्त आहेत. त्यामुळे वाहतूक शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांअभावी रिक्षा स्टँड इतर ठिकाणी हलवण्याचे नियोजन रखडल्याचे पालिका सांगत आहे. त्यामुळे पालिकेच्या तोडक कारवाईनंतरही शिवाजी चौक, बी कॅबिन रस्त्यावरील अनधिकृत रिक्षा स्टँड तसेच आहे.

अंबरनाथ रेल्वे स्टेशनच्या पूर्व व पश्चिम भागातील महत्त्वाच्या चौकांतील फेरीवाले आणि रिक्षा चालकांच्या वाढत्या बजबजपुरीविरोधात 15 दिवसांपूर्वी पालिकेने कारवाईची मोहीम हाती घेतली होती. तीन दिवस सुरु असलेल्या कारवाईत अनधिकृत फेरीवाले, फूटपाथवर साहित्य मांडलेले व्यापारी आणि अनधिकृ रिक्षा स्टँडचे रस्त्यावरील बॅरिकेड्स आणि अनधिकृत कार्यालयही हटवले होते. मात्र दोन दिवसानंतर पुन्हा फेरीवाल्यांनी रस्त्यावर ठाण मांडल्याचे चित्र आहे. दुसरीकडे रस्ता अडवणारे अनधिकृत रिक्षा स्टँड हटवून इतर ठिकाणी रिक्षा स्टँड सुरु करण्यासाठी वाहतूक विभागातील अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे पालिका सांगत आहे. मात्र, अंबरनाथ, बदलापूर शहराच्या वाहतूक व्यवस्थेचे नियोजन सांभाळणारे पोलिस निरीक्षक



### उल्हासनगरमध्ये वाहतूककोंडी

**दिवाळीच्या तोंडावर उल्हासनगरमधील कॅम्प नंबर दोन आणि तीनच्या परिसरातील बाजारपेठांत खरेदीसाठी जिल्हा आणि राज्यातून हजारो ग्राहक येत असतात. त्यामुळे वाढत्या वाहन संख्येमुळे बाजारपेठांत आणि शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे.**

आणि वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त ही दोन्ही पदे गेला दीड महिना रिक्त आहेत. त्यामुळे रिक्षा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन रिक्षा स्टँड हलवण्याबाबतचे नियोजन कारवाईनंतरही प्रलंबित असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. याबाबत अंबरनाथ, बदलापूर शहरातील वाहतूक व्यवस्थेचा सध्या पदभार सांभाळत असलेल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना पालिकेने रिक्षा स्टँड हलवण्याबाबत पत्र व्यवहारही केला आहे.

## सानपाडा येथे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे मंदा म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील नागरिकांच्या व महिलांच्या सुरक्षेसाठी आणि दिवसेंदिवस वाढत जाणारी गुन्हेगारी रोखण्यासाठी नवी मुंबईतील महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जात आहेत. त्यापैकी सानपाडा विभागात एकूण 10 ठिकाणी उभारलेल्या 21 सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे मंदा म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सानपाडा सेक्टर 8 येथे पोलिस चौकी येथे हा कार्यक्रम पार पडला.

यापूर्वी वाशी विभागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण करण्यात आलेले आहे. सानपाडा येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकरिता आमदार निधीमधून 25 लाख रुपयांचा निधीची म्हात्रे यांनी दिला आहे. तसेच लवकरच नेरुळ, सीवूड्स, सीबीडी-बेलापूर येथेही सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहे. नवी मुंबईतील शाळा,



महाविद्यालये, उद्याने, तलाव, बस डेपो, रेल्वे स्टेशन परिसर, सोसायटीच्या चौकात, शासकीय कार्यालये, हॉटेल परिसर, मंडई, बाजार, चौक व इतर सार्वजनिक ठिकाणी हे सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. तसेच दरोडा, चैन चोरी, महिला वर्गाला, मुली व ज्येष्ठ नागरिकांना या वाढत्या गुन्हेगारीचा होणाऱ्या त्रासापासून मुक्तता मिळावी यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून व सुरक्षेतेसाठी हे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविले जात आहेत.

सदरच्या सी.सी.टीव्ही कॅमेऱ्याची जोडणी स्थानिक पोलिस स्टेशन मार्फत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाला देण्यात येणार आहे. त्यामुळे जलद गतीने वाढत्या गुन्ह्यांची उकल होण्यास मदत होईल. नवी मुंबईतील संवेदनशील ठिकाणावर या सी.सी.टीव्ही कॅमेऱ्याची नजर राहणार असून गुन्हेगार त्वरित पकडले जाण्यास साहाय्य होईल. मंदा म्हात्रे या खऱ्या लोकसेवक आहेत. त्यांच्याकडे समाजपयोगी कोणतेही काम घेऊन गेल्यास त्या फक्त आश्वासन देत नाहीत. तर पूर्ण करून दाखवतात, अशा शब्दांत सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग आमले यांनी म्हात्रे यांचे कौतुक केले. या प्रसंगी सानपाडा पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक जयदेव राठोड, भाजप उपाध्यक्ष जगन्नाथ जगताप, श्वेता मढवी, मंडळ अध्यक्ष श्रीमंत जगताप, उत्तर भारतीय मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश राय आदी. नागरिक उपस्थित होते.

# पनवेलचा पहिला डोस शंभर टक्के पूर्ण

**पनवेल :** शहरातील 18 वर्षांवरील नागरिकांचा कोविडचा पहिला डोस 100 टक्के नागरिकांना देण्यात पनवेल महापालिकेलाही यश मिळाले आहे. पहिल्या डोसला पात्र असणाऱ्या एकूण 5 लाख 98 हजार 127 नागरिकांपैकी 5 लाख 46 हजार 747 जणांना पहिला डोस मिळाला आहे. त्यानुसार पालिकेचे 91 टक्के पहिल्या डोसचे लसीकरण झाले आहे. शहरात राहणारे परंतु मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे येथे कामाला जाणाऱ्या 53 हजार जणांचे बाहेरच्या क्षेत्रात पहिल्या डोसचे लसीकरण झाले आहे. हा आकडा गृहीत धरून पालिकेने पहिला डोस शंभर टक्के झाल्याचे जाहीर केले आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात 16 जानेवारीपासून कोविड लसीकरणास सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात आरोग्य कर्मचाऱ्यांचे लसीकरण केल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात पहिल्या फळीतील कर्मचाऱ्यांचे यामध्ये पोलिस विभाग,



### दुसरा डोस 48 टक्के पूर्ण

**आत्तापर्यंतच्या या सर्व नियोजनामुळे पनवेल महापालिकेच्या एकूण 8 लाख 14 हजार लोकसंख्येपैकी 18 वर्षांवरील 5 लाख 981 हजार 127 जणांनी पहिला डोस घेतला आहे. तसेच 2 लाख 87 हजार 217 नागरिकांचा दुसरा डोस म्हणजे जवळपास 48 टक्के पूर्ण करण्यात आला आहे.**

महसूल विभाग आदी कर्मचाऱ्यांचे लसीकरण केले. तिसऱ्या टप्प्यात ज्येष्ठ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. तयानंतर 45 ते 60 वयोगटातील नागरिकांचे लसीकरण झाले. शेवटच्या टप्प्यात 18 वर्षावरील नागरिकांचे लसीकरण करण्यास सुरुवात झाली. लशींचा साठा मोठ्या प्रमाणात येऊ लागताच पनवेल महापालिकेच्यावतीने सुरुवातीला असलेली 12 लसीकरण केंद्रे वाढवून 23 केली; तसेच जास्तीत जास्त लसीकरण होण्याच्या दृष्टीने प्रत्येक लसीकरण केंद्रांची क्षमता तीन पट वाढवली. यामुळे दर दिवशीचे सरासरी 13 ते 14 हजार लसीकरण करण्यात आले.

पालिका हद्दीतील ग्रामीण भागातील जनतेसाठी प्रत्येक गाव-पाड्यांवर लसीकरण सत्र उभारण्यात आले. यामुळे 100 टक्के गावांचे लसीकरण होऊ शकले. शासकीय ओळखपत्र नसणाऱ्यांचे विशेष लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात आले. वारांगना, बेडरिडन, गर्भवती, दिव्यांग अशा विविध घटकांना सामावून त्यांचे विशेष लसीकरण आयोजित करण्यात आले. पालिका हद्दीतील विविध वृद्धाश्रम, तळोजा कारागृह या ठिकाणीही लसीकरण करण्यात आले. 79 खासगी रुग्णालयांना अर्बन टास्क फोर्सअंतर्गत मान्यता देऊन जवळपास 150 खासगी लसीकरण केंद्रांद्वारे औद्योगिक क्षेत्रातील लसीकरण आणि मोठ्या सोसायट्यांमध्ये लसीकरण झाले.

DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021



ठाणेवैभव
अधिक बातम्यांसाठी आमच्या
वेबसाइटला भेट द्या
www.thanevaibhav.in

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ


कल्याण-डोंबिवली वैभव
एमएसआरडीसीने वीज बिल न भरल्याने गोविंदवाडी बायपास अंधारात
काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे आंदोलन
कडोंमपा क्षेत्रात विशेष स्वच्छता सप्ताहाचा प्रारंभ
सोनारपाडा येथील पाणीपुरवठा सुरळीत करण्याची रिपाइंची मागणी
२७ गावातील पाणीप्रश्नाकडे भूमिपुत्र पार्टीने वेधले आयुक्तांचे लक्ष
पाणी टंचाईने हैराण झालेल्या नागरिकांचा मोर्चा
माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांनी विचारला जाब

कल्याण-डोंबिवली वैभव
विशेष
➤➤पान ५ वर

भारतीय सौर दिनांक कार्तिक ४ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ६० | मंगळवार २६ ऑक्टोबर २०२१ | पाने ८ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

# ठाण्यातील सर्व प्रभागांत कोरोनाचे एक आकडी रुग्ण

## २४ नवीन रुग्ण; ठाणेकरांना दिलासा

**ठाणे: मागील दीड वर्ष कोरोना रुग्ण वाढीमुळे भीतीच्या छायेखाली वावरणाऱ्या ठाणेकरांना दिलासा मिळाला असून आज अवघे 24 नवीन रुग्ण सापडले आहेत. मागील काही दिवसात एकदम तळाला गेलेली ही रुग्णसंख्या आहे. दरम्यान आज 61जण कोरोनामुक्त झाले असूनएक रुग्ण दगावला आहे.**



**पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत शहरातील कोरोना रुग्णांचा आकडा दीड ते दोन हजाराच्या घरात गेली होती उपचारासाठी रुग्णांना हॉस्पिटलमध्ये बेड मिळत नव्हता हळू हळू रुग्ण वाढीवर नियंत्रण मिळवण्यात महापालिकेच्या प्रशासनाला यश आले आहे रुग्ण संख्या तळाशी गेली आहे तरी देखील नागरिकांनी त्रिसूत्रीचे पालन करावे असे आवाहन ठाणे महापालिका प्रशासनाने केले आहे.**

कोरोना हॉट स्पॉट असलेल्या माजिवडे-मानपाडा आणि वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात प्रत्येकी पाच नवीन रुग्णांची भर पडली आहे. चार रुग्ण उथळसरआणि तीन रुग्ण लोकमान्य-सावरकर नगर येथे वाढले आहेत. प्रत्येकी दोन रुग्ण नौपाडा-कोपरी, दिवा आणि मुंब्रा प्रभाग समिती परिसरात नोंदवले गेले आहेत. कळवा प्रभाग समिती येथे एक रुग्ण मिळाला आहे तर सर्वात कमी शून्य रुग्णाची नोंद वागळे प्रभाग समिती भागात झाली आहे.

विविध रुग्णालयात आणि घरी उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी 61जण आज रोगमुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत एक लाख 38 हजार 114जण ठणठणीत बरे होऊन घरी गेले आहेत तर रुग्णालयात आणि घरी 444 रुग्णांवर उपचार सुरु आहेत. आज एक रुग्ण दगावला असून आत्तापर्यंत दोन हजार 97जणांचा मृत्यू झाला आहे.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील दोन हजार बारा नागरिकांची कोरोना चाचणी घेतली होती. त्यामध्ये 24जण बाधित मिळाले आहेत. आत्तापर्यंत 20 लाख 49 हजार 412 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 40 हजार 655जण बाधित सापडले आहेत.

## थोडक्यात

### ठामपा कर्मचाऱ्यांना १५५०० रुपये बोनस

**ठाणे:** ठाणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना गेल्यावर्षी प्रमाणेच यंदाही दिवाळीचे सानुग्रह अनुदान म्हणून 15 हजार 500 बोनस जाहीर करण्यात आला आहे. तर कंत्राटी कामगारांना बोनस म्हणून अतिरिक्त एक महिन्याचा पगार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सानुग्रह अनुदानामुळे ठाणे महापालिकेवर तब्बल 12 कोटी 83 लाख 9 हजार रुपयांचा बोजा पडणार आहे.

ठाणे महापालिकेचे आठ हजार 278 कायस्वरुपी कर्मचारी असून कंत्राटी पद्धतीने

➤➤पान ४ वर

### नगरसेविकेची बेकायदा जाहिरातबाजी

**जाहिरात शुल्क वसूल करण्याची मनसेची मागणी**

**ठाणे :** आधीच शहराला बेकायदा होर्डिंग आणि बॅनर विळखा पडलेला असताना ठाण्याच्या वसंत विहार या उच्चभ्रू गृहसंकुलातील तब्बल 42 इमारतींच्या प्रवेशद्वारावर स्थानिक नगरसेविकेनेच बेकायदा जाहिरातबाजी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या एलईडी साईनबोर्डवर संबंधित सोसायटीच्या नावासह

➤➤पान ४ वर

### कोपरी नवीन पुलाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्या

**नगरसेवक भरत चव्हाण यांची आयुक्तांकडे मागणी**

**ठाणे :** ठाण्यातील नवीन कोपरी पुलाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी भाजपाचे नगरसेवक भरत चव्हाण यांनी महापालिका आयुक्तांना केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या धनगर समाजाच्या

➤➤पान ४ वर

## वागळे-वर्तकची तहान भागवेल येऊरचे हुमायून धरण

### प्रवीण नागरे यांचा जलसंपदा आणि पालकमंत्र्यांना प्रस्ताव

ठाणे | सुरेश सोंडकर

वाढत्या ठाण्याची तहानही दिवसेंदिवस वाढत असून औद्योगिक आणि नागरी वसाहत असलेल्या वागळे आणि वर्तकनगर परिसराला पाणीटंचाईचा नेहमीच फटका बसत आहे. येऊरमधील हुमायून धरण कार्यान्वित केले तर या भागांची तहान भागू शकेल, असा प्रस्ताव सामाजिक कार्यकर्ते प्रवीण नागरे यांनी पालक मंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्याकडे सादर केला आहे.

ठाणे शहराला स्टेम आणि एमआयडीसीमार्फत पाणी पुरवठा होत आहे. एमआयडीसीमार्फत ज्या परिसराला पाणी पुरवठा होतो, ते भाग नेहमीच पाणी टंचाईने त्रस्त असल्याचे वाढत्या तक्रारींमुळे स्पष्ट झाले आहे. या पाणी टंचाईचा फटका अन्य भागांसह वर्तकनगर आणि वागळे प्रभागालाही मोठ्या प्रमाणात



बसतो. या पार्श्वभूमीवर येऊरमधील हुमायून धरण दिलासादायक ठरु शकतो.

गेल्या दोन वर्षांपासून घोडबंदर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते प्रवीण नागरे या धरणाच्या पुनर्निर्मितीबाबत आग्रही आहेत. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या निदर्शनास ही बाब त्यांनी आणून दिली असून शिवसेनेचे विभाग प्रमुख मुकेश ठोमरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आज जलसंपदामंत्री जयंत पाटील आणि पालकमंत्री शिंदे

➤➤पान ४ वर

## बदलापूर नगरपालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

### बोनससह 30 हजार रुपये मिळणार

**बदलापूर:** बदलापूर नगरपालिका कर्मचाऱ्यांना यंदा दिवाळीआधी सानुग्रह अनुदानासह फेस्टिव्हल एडव्हान्स व महागाई भत्त्यातील फरक असे प्रत्येकी सुमारे 30 हजार रुपये मिळणार असून त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

बदलापूर नगरपरिषदेतील भारतीय कामगार कर्मचारी महासंघ या मान्यताप्राप्त कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज मुख्याधिकारी योगेश गोडसे यांच्याशी घेतलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याप्रसंगी प्रशासनातर्फे मुख्याधिकाऱ्यांसह सामान्य प्रशासन अधिकारी विठ्ठल राठोड, सिद्धार्थ पवार तर भारतीय कामगार कर्मचारी महासंघाच्या वतीने सरचिटणीस लक्ष्मण कुडव, कुळगाव बदलापूर नगर परिषद युनिट प्रमुख विनोद वाल्मिकी, दीपक जाधव, राजेंद्र वाल्मिकी आदी उपस्थित होते.

या बैठकीत कामगारांना 11 हजार रुपये सानुग्रह अनुदान, महागाई भत्त्यातील फरक तसेच फेस्टिव्हल एडव्हान्स एकत्रितपणे देण्याचा निर्णय घेण्यात आला. शनिवारपर्यंत ही रक्कम एकत्रितपणे कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना दिवाळीआधी प्रत्येकी सुमारे 30 हजार रुपये मिळणार असल्याची माहिती लक्ष्मण कुडव यांनी दिली. यासंदर्भात केलेल्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत

➤➤पान ४ वर

## तळीरामांची झिंग येऊरकरांनी उतरवली

■ भारत-पाक सामन्याच्या निमित्ताने रविवारी रात्री येऊर तुडुंब ■ ग्रामस्थांचा रस्ता रोको





**ठाणे:** येऊर गावात संध्याकाळी सहानंतर बाहेरच्यांना येण्यास मज्जाव असतानाही रविवारी भारत-पाकिस्तान सामन्याचे निमित्त साधून तळीरामांनी गाव गजबजून गेले, त्यामुळे संतप्त गावकऱ्यांनी रात्रीच गावात येणाऱ्या शेकडो गाड्या येऊरच्या प्रवेशद्वाराच अडवून रास्ता रोको केला. या आंदोलनामुळे वन कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत संशय निर्माण झाला आहे.

येऊरमध्ये हॉटेल आणि ढाबे चालकांनी रविवारी भारत आणि पाकीस्तानचा सामना पाहण्यासाठी मोठ्या पडद्याची व्यवस्था केली होती. त्यामुळे सांयकाळी सहानंतर येऊरमध्ये येणाऱ्यांची गर्दी वाढत होती. या गर्दीमुळे गावातील शांतता भंग पावली. अखेर संतप्त गावकऱ्यांनी थेट येऊरच्या प्रवेशद्वारावर रस्त्यात बसून बाहेरुन येणाऱ्या गाड्या थांबविण्यास सुरवात केली. या आंदोलनामुळे येथील रस्त्यावर वाहनांच्या रांगा दूरपर्यंत लागल्याचे दिसत होते. अखेर याठिकाणी पोलिसांनी मध्यस्ती

➤➤पान ४ वर

## रेल्वेच्या मुंबई उपनगरी सेवा २८ ऑक्टोबरपासून १०० टक्के

**मुंबई:** उपनगरीय लोकलमधील प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन, आता 28 ऑक्टोबरपासून मध्य आणि पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवा प्री-कोविड स्तरावर म्हणजेच मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागात 100 टक्केचालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

22 मार्च 2020 पासून कोविड-19 लॉकडाऊनमुळे रेल्वे सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली होती. नंतर 15 जून 2020 पासून, रेल्वेने राज्य सरकारने निवडलेल्या आणि रेल्वे मंत्रालयाने मंजूर केलेल्या अत्यावश्यक सेवा श्रेणींसाठी उपनगरीय सेवा सुरु केल्या. उपनगरीय गाड्यांमध्ये प्रवास करण्यासाठी राज्य सरकारने परवानगी दिलेल्या आणि रेल्वे मंत्रालयाने मंजूर केलेल्या प्रवाशांच्या श्रेणी, नंतर ऑगस्ट 2021 मध्ये आणि अलीकडच्या आठवड्यात वाढवण्यात आल्या.

सध्या, मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे अनुक्रमे मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागात 1702 आणि 1304 उपनगरीय सेवा चालवत आहेत ज्या त्यांच्या एकूण उपनगरीय सेवांच्या 95.70% आहे.

28 ऑक्टोबर 2021 पासून, मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे, मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागात प्री-कोविड स्तरावर 100टक्के उपनगरीय सेवा म्हणजेच मध्य रेल्वेवर 1774 आणि पश्चिम रेल्वेवर 1367 सेवा चालवतील. फक्त राज्य सरकारने निवडलेल्या श्रेणी आणि त्यांनी जाहीर केलेल्या एसओपीनुसार प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

## जिल्ह्याची तहान वाढण्यापूर्वीच धरणे पूर्ण करा- जलसंपदा मंत्री

### टास्क फोर्सची जयंत पाटील यांची घोषणा



**ठाणे:** ठाणे जिल्ह्यातील अनेक शहरांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा व्हावा, यासाठी उपाय योजना सुचविण्यासाठी तसेच जिल्ह्यातील प्रलंबित जलसंपदा प्रकल्पांच्या पाठपुराव्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचा टास्क फोर्स गठित करण्यात येणार आहे, अशी घोषणा जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी केली आहे.

प्रथम प्राधान्याने काळू धरण मार्गी लागल्यानंतर शाई

➤➤पान ४ वर

**टास्क फोर्समध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जलसंपदा, महसूल, वन विभाग, मुंबई महानगर विकास प्राधिकरण, जीवन प्राधिकरण आदीसंबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.**

## बेशिस्त रिक्षाचालक ताळ्यावर; दोन लाखांचा दंड वसूल

**ठाणे:** प्रवाशांशी बेशिस्त वर्तन करून वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या 986 बेशिस्त रिक्षा चालकांच्या विरोधात कारवाई करून वाहतूक शाखेच्या पोलिसांनी अवघ्या चार दिवसांत दोन लाखांपेक्षा जास्त दंड वसूल केला आहे.

वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी शहरातील रिक्षा चालकांना शिस्त लावण्यासाठी ठाणे रेल्वे स्थानक परिसरात 20 ते 24ऑक्टोबर दरम्यान विशेष मोहिम राबवली होती. त्यामध्ये 218 रिक्षा चालकांनी पोशाख घातला



नव्हता. 27 जणांकडे वाहन परवाना नव्हता. सात जणांनी प्रवासी भाडे नाकारले तर एकाने प्रवाशांबरोबर बेशिस्त वर्तन केले. चार जण बेदरकारपणे रिक्षा चालवताना आढळले. 244 जणांनी त्यांच्या रिक्षा स्टँड सोडून उभ्या केल्याचे दिसून आले. 85जणांनी बेशिस्तपणे रिक्षा उभ्या केल्या होत्या. 94 रिक्षा नो पार्किंग ठिकाणी होत्या. 34 जणांनी सिग्नलचा नियम मोडला होता. 172जणांनी रिक्षा चालकाची माहिती दर्शनी भागात लावली नाही आणि इतर नियम मोडल्याबद्दल एकूण 986जणांच्या विरोधात कारवाई करून दोन लाख 17 हजार 900 रुपये दंडाचे चलन पोलिसांनी फाडले असल्याचे पोलीस उपायुक्त श्री. पाटील यांनी सांगितले. ही मोहीम अशीच पुढे सुरु राहणार असल्याचेही ते म्हणाले.

## केंद्राच्या 'सुदर्शन भारत परिक्रमे'च्या स्वागताचा मान ठाणेकराला

**ठाणे:** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्रीय गृहमंत्रालयाच्या वतीने 'सुदर्शन भारत परिक्रमा' आयोजित केली आहे. सुमारे 51 एनएसजी गार्ड या परिक्रमेत सहभागी झाले असून सध्या ही परिक्रमा महाराष्ट्रात दाखल झाली आहे. या परिक्रमेत सहभागी होण्याचा मान ठाणेकर नागरिक सुरेंद्र उपाध्याय यांना मिळाला आहे.

देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सुदर्शन भारत परिक्रमा आयोजित केली आहे. या परिक्रमेसाठी टाटा कंपनीने आपल्या 18 हॅरियर गाड्या सरकारला दिल्या आहेत. या गाड्यांमधून एनएसजीचे सुमारे 51 जवान सहभागी झाले आहेत. एनएसजीची ही कार रॅली देशाचा 12 राज्यांमधील काकोरी




स्मारक, भारत माता मंदिर, नेताजी भवन, स्वराज आश्रम, टिळक घाट, फ्रिडम पार्क, ऑगस्ट क्रांती मैदान, मणीभवन, साबरमती या 18 प्रमुख शहरांतील शहिद स्मारकांना भेट देऊन नवी दिल्लीतील लाल किल्ला येथे समारोप होणार आहे. त्यानुसार रविवारी सायंकाळी ही रॅली महाराष्ट्रामध्ये दाखल झाली.

महाराष्ट्रात आल्यानंतर या रॅलीने पहिला थांबा पनवेल येथील हेरिटेज मोटार्स येथे घेतला. या एनएसजी गार्डच्या स्वागताचा मान यावेळी हेरीटेज मोटार्सचे संचालक सुरेंद्र उपाध्याय यांना मिळाला. यावेळी संतोष तिवारी हेदेखील उपस्थित होते.

या 51 एनएसजी गार्डचे उपाध्याय यांनी स्वागत तसेच सत्कार केला. विशेष म्हणजे, एनएसजीच्या जवानांनीही उपाध्याय यांना त्यांची मानाची टोपी आणि प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव केला. या संदर्भात उपाध्याय यांनी सांगितले की, एनएसजीच्या या परिक्रमेचे स्वागत करण्याचा मान मला मिळणे हा माझे सौभाग्य समजतो. मात्र, हा मान माझ्या एकट्याचा नसून तमाम ठाणे-पनवेलकरांचा आहे.




प्रसिद्धीच्या झोतात न आलेल्या पण सुप्रसिद्ध समाजसेवीपेक्षा कणभरही कमी नसलेल्या, तुमच्या आमच्यासारख्या पन्नास ज्येष्ठ नागरिकांच्या, ठाणेवैभव दैनिकाने नियमित प्रसिद्ध केलेल्या मुलाखतींचे संकलन असलेले सेकंड इनिंग हे स्फूर्तिदायक पुस्तक शारदा प्रकाशनने नुकतेच प्रकाशित केले आहे.

प्रकाशक श्री. संतोष राणे
लेखिका श्रीमती कुमुदिनी नरेन्द्र बल्लाळ
ठाणेवैभव कार्यालयात उपलब्ध

# कॉंक्रीट रस्ते व गटारींच्या बांधकामांना सुरुवात; मनसेने सातत्याने पाठपुरावा केल्याचा दावा

**उल्हासनगर:** अनेक वर्षांपासून तुंबलेल्या गटारी, उघड्या ड्रेनेज व सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या बांधकामांना मनपा प्रशासनाने सुरवात केली असून मनसे संघटक मैनुद्दीन शेख यांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे. मनसेने सातत्याने पाठपुरावा केल्यानेच या कामांना सुरुवात झाल्याचे शेख यांचे म्हणणे आहे.

उल्हासनगर -1 येथील पॅनल क्रमांक 1 मध्ये असलेल्या शिवनेरीनगर परिसरातील एमआयडीसी रस्त्यावरील मुख्य भुयारी गटारी (ड्रेनेज लाईन) गेल्या 5 वर्षांपासून तुंबलेल्या अवस्थेत होत्या. गल्ल्यांमधील ड्रेनेज लाईन या गटारींमध्येच सोडलेल्या होत्या. यामुळे परिसरातील लोकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत होता.



भर रस्त्यावर दुर्गंधीयुक्त सांडपाणी वाहत असल्याने नागरिक हैराण झाले होते, असा आरोप मैनुद्दीन शेख यांनी केला आहे.

या संदर्भात 2019 पासून आपण मनपा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत असून अनेक वेळा मनसे नेते व पदाधिकाऱ्यांनी आंदोलनांमार्फत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. याच परिसरात ठाणे जिल्ह्यातील नावाजलेले विठ्ठल मंदिरही आहे आणि याच विठ्ठल मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर अशी घाण आणि दुर्गंधी असणे व रस्त्याची दुरवस्था यामुळे स्थानिक नागरिकांसोबतच मंदिरात येणाऱ्या भाविकांना देखील त्रास होत होता अशी खंत मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली होती.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सामान्य निधीतून या ड्रेनेज लाईन व कॉंक्रीट रस्त्याच्या कामाला निधी उपलब्ध झाला आणि काम सुरु करण्याचे आदेश संबंधित ठेकेदाराला देण्यात आलेले आहेत. निधी मंजूर केल्याबद्दल आणि काम सुरु केल्याबद्दल उल्हासनगर महानगर पालिकेच्या संबंधित विभागाचे मनसे तर्फे आभार मानण्यात आले आहे .

यावेळी उल्हासनगर मनसेचे शहर संघटक मैनुद्दीन शेख, वाहतूक सेनेचे शहर अध्यक्ष काळू थोरात, विभाग अध्यक्ष बादशहा शेख तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिक आणि महिला वर्ग तसेच मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कासवगतीने काम करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाका

## डॉ. श्रीकांत शिंदे यांचे महापालिकेला निर्देश

**ठाणे:** जे ठेकेदार वेळेवर काम करीत नसतील त्यांची कामे काढून घ्या किंवा अशा ठेकेदारांना काळ्या यादीत टाका असे स्पष्ट निर्देश खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिले आहेत.

सध्या दिव्यात अपूर्ण असलेल्या कामांमुळे, पाण्याच्या समस्येमुळे भाजपकडून सत्ताधारी शिवसेनेवर टीका केली जात आहे. त्यामुळे पालिकेच्या चुकांमुळे किंवा ठेकेदारांच्या कामातील ढिलाईमुळे शिवसेनेच्या स्थानिक नगरसेवकांना टिकेचे धनी व्हावे लागत आहे. त्यामुळे येथील विकास कामे केव्हा मार्गी लागणार, दिव्यातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी रिमॉडेलींगची कामे केव्हा पूर्ण होणार असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.



त्यातही मागील काही महिन्यांपासून येथील कामे पावसामुळे तसेच निधीअभावी थांबली होती. ती कामे सुरु करण्यासाठी आता पालिकेकडून संबंधित ठेकेदारांना निर्देश देण्यात आले आहेत. मात्र तरीसुध्दा कामे सुरु करण्यात आलेली नसल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यामुळे अर्धवटस्थितीत असलेल्या या कामांचा फटका दिवेकरांना सहन करावा लागत आहे.

दरम्यान या संदर्भात खासदार शिंदे यांनी यावरुन पालिका अधिकाऱ्यांची चांगलीच खरडपट्टी काढली. सुचना देऊनही ठेकेदार काम करीत नसतील तर त्यांची कामे काढून घ्या, किंवा जे काम करणार नाहीत, अशा ठेकेदारांना काळ्या यादीत टाका असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

पान ३ वरुन

## तळीरामांची झिंग येऊरकरांनी उतरवली

केली आणि हे आंदोलन मागे घेण्यात आले.

येथील हॉटेल, बंगल्याच्या दुरुस्तीला परवानगी दिली जाते, त्यांच्यासाठी येणारी वाहने सोडली जातात. मात्र आमची कच्ची घरे आता पक्की करायची झाल्यास त्यासाठी रेती, विटांच्या गाड्या मात्र वनविभागाचे कर्मचारी अडवतात. सांयकाळी सहानंतर वाहनांना परवानगी नसतांनाही वाहने सोडली जात आहेत. त्यातही कोणत्याही स्वरुपाची पावती न फाडता वाहने सोडली जात असल्यानेच हा रस्ता रोको करण्यात आल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले.

याबाबत दोन दिवसात पोलीस आणि वनविभागाची बैठक घेतली जाणार आहे. संध्याकाळी सहानंतर बाहेरील वाहनांना परवानगी देऊ नये यासाठी निवेदन दिले जाणार आहे. परंतु त्यानंतरही काही तोडगा निघाला तर यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

## जिल्ह्याची तहान वाढण्यापूर्वीच धरणे पूर्ण करा- जलसंपदा मंत्री

धरणाचे काम घेतले जाणार असल्याची घोषणा राज्याचे जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी आज येथे केली. या टास्कफोर्सने उपाय योजना सुचविल्यानंतर मंत्रालयस्तरावर बैठक घेऊन त्याच्या अंमलबजावणीबाबत निर्णय घेतला जाईल असे स्पष्ट केले.

जिल्ह्यातील जलसंपदा विभागाची आढावा बैठक श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कोपर येथील सिंचन भवनात झाली. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, आमदार दौलत दरोडा, आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, जलसंपदा विभागाचे सचिव (जलसंपदा) अ. प्र. कोहिरकर, ठाणे महानगरपालिका आयुक्त बिपीन शर्मा, उल्हासनगर महापालिका आयुक्त डॉ. मंताडा राजा दयानिधी, मीरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले, कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक बसवंत स्वामी, कार्यकारी अभियंता नरेंद्र महाजन, अधीक्षक अभियंता श्री. सोनटक्के, ठाण्याचे उपविभागीय अधिकारी अविनाश शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा, मुमरी, नामपाडा, पवाळे, कुशिवली, काळू, शाई या प्रकल्पांच्या सद्य:स्थितीतील कामांचा आढावा घेतला. त्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ठाणे जिल्ह्यातील काळू नदीवरील धरण प्रथम पूर्ण केले जाईल या धरणाची 12 टीएमसी इतकी क्षमता असल्याचे सांगितले. त्यानंतर शाई धरणाचे काम हाती घेतले जाईल असे स्पष्ट केले.

जलसंपदा मंत्री श्री. पाटील पुढे म्हणाले की, मुंबईच्या शेजारी असलेल्या पालघर व ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नागरिकरण वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येला पुरेसा पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. सध्या ठाणे जिल्ह्याला धरणातील पाणी अपुरे पडत आहे. त्यामुळे सध्या सुरु असलेल्या काळू व शाई प्रकल्पाच्या कामास वेग द्यावा. तसेच पुढील सन 2050 पर्यंतच्या लोकसंख्येचा विचार करुन वाढती लोकसंख्या व पर्यायाने वाढत असलेली पाण्याची गरज तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागांना दिलासा देण्यासाठी कोणत्या प्रकारची पावले उचलावी लागतील याचा आराखडा तयार करावा. तसेच पिंजाळ, दमणगंगा पिंजाळ नदी जोड प्रकल्प, काळू प्रकल्प, कोंढाणे, सुसरी नदी प्रकल्प आदी प्रस्तावित प्रकल्पांच नियोजन करावे.

टास्क फोर्समध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जलसंपदा, महसूल, वन विभाग, मुंबई महानगर विकास प्राधिकरण, जीवन प्राधिकरण आदीसंबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

ठाणे शहराला पाणीपुरवठा होणाऱ्या पाईपलाईनची दुरुस्तीसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे. तसेच काळाची पावले ओळखून हे प्रकल्प टरशरी प्रकल्पांत रुपांतरित करुन ते पाणी उद्योगासाठी वापरावे यासाठी महापालिका आयुक्तांनी प्रयत्न करावे असे निर्देश यावेळी देण्यात आले.

**प्रकल्पांना वेग देण्याची गरज- पालकमंत्री एकनाथ शिंदे**

पालकमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, ठाणे जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येला पुरेसा पाणी पुरवठा होण्यासाठी जिल्हयातील प्रकल्पांना वेग देण्याची गरज आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील टास्क फोर्सने प्रलंबित कामांचा आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात. तसेच शहापूर व परिसरातील गावांचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करावी. ठाणे शहराची पाणीसमस्या सोडवण्यासाठी आधी निश्चित करण्यात आलेल्या सूत्रानुसार बारवी धरणातील 100 एमएलडी पाणी उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी ठाणे मनपा आयुक्त विपीन शर्मा यांनी केली. तर येऊरच्या पायथ्याशी असलेल्या भागांचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी वर जंगलात असलेल्या बंधारा बांधून तेथे पाणी अडवून पाणी द्यावे अशी मागणी श्री. शिंदे यांनी केली. त्यावर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी दिले

**जलवाहिन्यांची दुरुस्ती करावी- गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड**

कळवा, मुंब्रा, नवी मुंबई यापरिसरात मोठ्या प्रमाणात डोंगर आहे. या डोंगरांवर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधल्यास कळवा व मुंब्रा परिसरातील पाण्याचा प्रश्न मिटेल, असे गृहनिर्माण मंत्री डॉ. आव्हाड यावेळी म्हणाले. पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांची दुरुस्ती करण्यात यावी असे त्यांनी यावेळी सांगितले.

## बदलापूर नगरपालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

मुख्याधिकारी योगेश गोडसे यांनी ही मागणी मान्य करून कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड केल्याबद्दल लक्ष्मण कुडव यांनी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाच्या वतीने मुख्याधिकारी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## ठामपा कर्मचाऱ्यांना १५५०० रुपये बोनस

काम करणाऱ्या कामगारांची संख्या अडीच हजारांच्या घरात आहे. त्यामुळे दिवाळीच्या आधीच सानुग्रह अनुदान जाहीर झाल्याने कर्मचाऱ्यांची दिवाळी मात्र गोड होणार आहे.

ठाणे पालिकेकच्या विविध विभागात स्थायी, अस्थायी, ठोक पगारावरील कर्मचारी, अनुकंपा वारसा कर्मचारी अशा आठ हजार कर्मचाऱ्यांच्या दिवाळी बोनसचा निर्णय घेण्यात आला. मागील वर्षी पालिका कर्मचाऱ्यांना 15 हजार 500 रुपये सानुग्रह अनुदान देण्यात आले होते. गेल्यावर्षी कोरोनामुळे पालिकेच्या उत्पन्नात वाढ न झाल्याने यंदा देखील तेवढेच अनुदान देण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांना 25 हजाराचे सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी म्युनिसिपल लेबर युनियनचे अध्यक्ष रवी राव यांनी केली होती. मात्र 25 हजार बोनस देण्याची मागणी मान्य न करता कायस्वरुपी कामगारांना 15 हजार 500 तर कंत्राटी कामगारांना एक महिन्याचा पगार बोनस म्हून देण्यात येणार असल्याचे महापौर नरेश म्हस्के यांनी जाहीर केले.

महापालिकेत कायस्वरुपी कर्मचाऱ्यांची संख्या पाच हजार 83 एवढी आहे. अनुकंपा वारसा तत्वावरील कर्मचारी दोन हजार 58, ठोक पगारावरील कर्मचारी 252, शिक्षण विभागातील कर्मचारी एक हजार 51, शिक्षण विभागातील ठोक पगारावर कर्मचारी 23 असे एकूण आठ हजार 278 कर्मचारी कार्यरत आहेत.

महापालिका कर्मचाऱ्यांना 2014 -15 मध्ये 12 हजार 500, 2015-16 मध्ये 13 हजार 250, 2016 -17 मध्ये 14 हजार, 2017-18 मध्ये 15 हजार 100 तर 2018-19 मध्ये 15 हजार 500, 2019-20 मध्ये 15 हजार 500 रुपये अनुदान देण्यात आले होते तर 2020-21 मध्ये 15 हजार 500 सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे

## नगरसेविकेची बेकायदा जाहिरातबाजी

नगरसेविका व त्यांच्या पतीचा नामोल्लेख करण्यात आला आहे. नगरसेवक निधीतून हे काम झालेले नसतानाही त्यावर महापालिकेचा लोगो वापरुन स्थानिकांची दिशाभूल करण्यात आली आहे. या जाहिरातबाजीतून महापालिका प्रशासनाला उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे संबंधितांकडून दरपत्रकानुसार शुल्क आकारण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

ठाणे पालिकेच्या तिजोरीत आधीच खडखडाट असताना प्रभाग सुधारणा निधीचा बिनदिक्कतपणे अपव्यय प्रभाग क्र. 5 मध्ये आधीपासून सुरु असतानाच आता थेट महापालिकेचा लोगो वापरुन या प्रभागातील वसंत विहार परिसरात स्थानिक नगरसेविकेने बेकायदा जाहिरातबाजी केली आहे. संबंधित जाहिरात फलकांचे काम पालिकेच्या माध्यमातून केले नसल्याचे वर्तकनगर प्रभाग समितीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता शैलेंद्र चारी यांनी सांगितले. तर दुसरीकडे याच प्रभागात आणखी एका नगरसेविकेने शिवाईनगर येथील स्वागत फलकावर स्वत:सह तिच्या पतीची छबी झळकावली होती. या फलकावरील मजकुराबाबत कोणतीही मान्यता दिलेली नसल्याचे वर्तकनगर प्रभाग समिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रकाश खडतरे यांनी सांगितले. त्यामुळे या प्रभागातच स्थानिक लोकप्रतिनिधींना मनाला वाटेल तशा पद्धतीने जाहिरातबाजी करण्याची सूट दिली आहे का असा प्रश्न येथील नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

स्वतःच्या खिशातून जाहिरातबाजी करणाऱ्या या नगरसेवकांना दैनंदिन जाहिरात शुल्क निश्चितच परवडणारा आहे. त्यातच महापालिका प्रशासनाला कोरोना काळात निधीची कमतरता भासत आहे. त्यामुळे या लोकप्रतिनिधींकडूनच जाहिरात शुल्क घेतल्यास पालिकेच्या तिजोरीत भर पडेल. हे नगरसेवक उदार आहेत, नक्कीच शुल्क भरतील असा आम्हाला विश्वास वाटतो. अन्यथा मनसे स्टाईल या जाहिरातबाजीला उत्तर दिले जाईल, असा इशारा मनसेचे विभाग अध्यक्ष संदीप पाचंगे यांनी दिला आहे.

## कोपरी नवीन पुलाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्या

आराध्य दैवत आहेत. त्या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. राणी अहिल्यादेवी यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे, नदीघाट, रस्ते, पूल बांधले; त्यांचा जिर्णोद्धार केला. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकामही केले. त्यात द्वारका, गुजरात, काशी, वाराणसी, उज्जैन, जगन्नाथपुरी, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, बद्रीकेदार, नाशिक व परळी वैजनाथ, जेजुरी खंडोबा तसेच अनेक जोतिर्लिंग यांचा प्रामुख्याने समावेश आहे. जनतेचा हितासाठी त्यांनी अनेक कामे केली यामध्ये सती परंपरा बंद केले तसेच हुंडाबळीसाठी आपल्या राज्यकालात त्यांनी कडक धोरण लागू केले. उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांची खास ओळख आहे. नवीन कोपरी पुलाच्या येणाऱ्या जाणाऱ्या फ्लाय ओव्हर ब्रिजला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी भाजपाचे स्थानिक नगरसेवक भरत चव्हाण यांनी महापालिका आयुक्त विपीन शर्मा यांच्याकडे केली आहे. निवेदनाची एक प्रत एमएमआरडीएला देण्यात आली असून महापालिका महासभेत देखील मागणी करणार असल्याचे माहिती नगरसेवक भरत चव्हाण यांनी दिली आहे.

## वागळे-वर्तकची तहान भागवेल येऊरचे हुमायून धरण

यांच्याकडे याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. 1990च्या दरम्यान हे धरण बांधण्यात आले असून ते आता पडक्या स्थितीत आहे. सुमारे 300 एमएलडी पाणी साठवण्याची क्षमता या धरणाची असून ग्राव्हिटीद्वारे टंचाईग्रस्त वागळे आणि वर्तकनगर परिसराची तहान भागवण्याची क्षमता आहे. हे धरण पुन्हा बांधल्यास उपलब्ध पाणी पुरवठ्याच्या स्त्रोतावरील ताणही कमी होणार असल्याचे श्री. नागरे यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले आहे.



## परिमंडळ लोकशाही दिनाचे आयोजन

**ठाणे:** नागरिकांच्या वैयक्तीक तक्रारींचा निपटारा तातडीने व्हावा यासाठी तालुकास्तरिय लोकशाही दिनाच्या धर्तीवर आता ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दर महिन्याच्या तिस-या सोमवारी परिमंडळ स्तरावरही लोकशाही दिनाचे आयोजन केले असून 15 नोव्हेंबर, 2021 रोजी परिमंडळ लोकशाही दिन होणार आहे.

या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी 15 दिवस आधी 1 नोव्हेंबर, 2021 पूर्वी आपली निवेदने सादर करण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

परिमंडळ-1 (कळवा, मुंब्रा, दिवा प्रभाग समिती अंतर्गत), उपायुक्त कार्यालय, कळवा प्रभाग समिती कार्यालय, कळवा, परिमंडळ-2 (नौपाडा, वागळे प्रभाग समिती अंतर्गत), उपायुक्त कार्यालय, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.), परिमंडळ-3 (उथळसर, वर्तकनगर, लोकमान्य-सावरकरनगर, माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)येथे अर्ज दाखल करावेत.

नागरिकांनी प्रथमतः परिमंडळ लोकशाही दिनात अर्ज दाखल करावेत. परिमंडळ लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास नागरिक महापालिका लोकशाही दिनामध्ये नियमानुसार 15 दिवस आधी आपली निवेदने सादर करु शकतील.

# मोठ्या गृहप्रकल्पांच्या ठिकाणी अंडरपास वा उड्डाणपूल पुल उभारा

## मनसे आमदार राजू पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**कल्याण :** मेगा टाऊनशिपला परवानगी देताना भविष्यात वाढणाऱ्या वाहतुकीच्या दृष्टीकोनातून संबंधित विकासकाला प्रकल्प ठिकाणी अंडरपास अथवा उड्डाणपूल करणे बंधनकारक करावे अशी मागणी मनसे आमदार राजू पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



राज्यातील विविध मुख्य शहरांमध्ये मेगा टाऊनशिप प्रकल्प सुरु असून कल्याण ग्रामीण मतदारसंघातही लोढा पलावा, रुणवाल मायसिटी, रुणवाल गार्डन, अनंतम् रिजन्सी सारखे मेगा टाऊनशिप प्रकल्प सुरु आहेत. त्यातील काही प्रकल्प कार्यरत झाले आहेत. त्यामुळे कल्याण ग्रामीण भागातील लोकवस्ती भरमसाठ वाढली आहे. हे सर्व प्रकल्प रेल्वे लोकल सेवेपासून लांब असल्यामुळे यामध्ये राहणारे बहुतांश रहिवासी नोकरी-व्यवसायानिमित्त रस्ते वाहतुकीवर अवलंबून आहेत. त्यामुळे या प्रकल्पांना जोडणाऱ्या कल्याण-शिळ व काटई-बदलापूर-तळोजा रस्त्यावर नेहमीच वाहतुक कोंडी असते त्यामुळे वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उड्डाणपूल अथवा अंडरपास अशी मागणी मनसे आमदार राजू पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली असून तसे पत्रही दिले आहे.

सध्या लोढा पलावा, कासा रिओ, रुणवाल गार्डन, रुणवाल मायसिटी, अनंतम् रिजन्सी हे सर्व मेगा टाऊनशिप प्रकल्प कल्याण-शिळ रस्त्याला जोडण्यात आले आहेत. तर लोढा लेकशोर प्रकल्प काटई-बदलापूर रस्त्याला जोडण्यात आला आहे. ज्या प्रकल्पांमध्ये प्रवेश करण्यासाठी बायपासही उपलब्ध नाही. आधीच कल्याण-डोंबिवली, भिवंडी, बदलापूर, अबरनाथ, उल्हासनगर मध्ये राहणाऱ्या नागरिकांना कल्याण-शिळ रस्त्याशिवाय पर्याय नसून या रस्त्यावर वाहतूक कोंडीचा प्रश्न नेहमीचा आहे, त्यातच आता अधिक भर पडत आहे.

अशा मेगा टाऊनशिपला परवानगी देताना परिसरात वाढणारी लोकवस्ती गृहीत धरुन प्रकल्पाच्या ठिकाणी उड्डाणपूल अथवा अंडरपास करणेबाबत धोरण आखणे आवश्यक आहे. तसे न केल्याने आज मुख्य रस्त्यावर वाहतुककोंडी होताना दिसते. प्रकल्प कार्यरत होऊन 10-10 वर्षे झाली तरी उड्डाणपूल किंवा अंडरपास मंजूर होत नाही व मंजूर झाल्यास निधी अभावी पूर्ण होण्यास पुढील 10 वर्षाचा काळ लागतो. अशावेळी सर्वसामान्य नागरिकांना सततच्या वाहतुककोंडीचा सामना करावा लागतो आहे, तोपर्यंत विकासक प्रकल्प पूर्ण करुन निघून गेलेले असतात. तरी या महत्त्वाच्या विषयावाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा कारण हा प्रश्न केवळ कल्याण ग्रामीण मतदार संघापुरता मर्यादित नाही.

ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पुणेसह राज्यातील विविध शहरांमध्ये असे प्रकल्प सुरु आहेत आणि सगळीकडे अशा अडचणी निर्माण झाल्या आहेत व भविष्यात होणार आहेत. त्यामुळे या प्रकल्पामध्ये राहणाऱ्या नागरिकांसह स्थानिक प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो. तरी याबाबत तातडीने निर्णय घेतला पाहिजे व मेगा टाऊनशिपसाठी परवानगी देताना वाहतुक कोंडीच्या दृष्टीकोनातून विकासकाला प्रकल्प ठिकाणी उड्डाणपूल अथवा अंडरपास बंधनकारक करावा व त्याचा अतिरिक्त फायदा संबंधित विकासकांना सदर प्रकल्पामध्ये द्यावा असे आमदार यांचे म्हणणे असून याबाबत त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे याच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

# कचोरे प्रभागातील रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटच्या कामाचा शुभारंभ

## खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिला २० लाखांचा निधी



**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पूर्व येथील प्रभाग क्र. 45 कचोरे येथील रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटच्या कामाचा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याहस्ते शुभारंभ करण्यात आला आहे.

या सिमेंट कॉंक्रीटीकरणासाठी खासदारांनी 20 लाखांचा निधी दिला असून याबाबत परिवहन समिती सभापती तथा शिवसेना उपशहर संघटक मनोज चौधरी यांनी खासदारांकडे पाठपुरावा केला होता.

कल्याण पूर्वेतील कचोरे गावातील सदानंद चौधरी यांच्या घरापासुन ते विनायक चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता बनविणे आवश्यक होते. यासाठी परिवहन सभापती मनोज चौधरी यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे निधीची मागणी केली होती. खासदारांनी देखील या कामासाठी निधी देत कामाला मंजुरी दिली. त्यानुसार या रस्त्याच्या कामाच्या सिमेंट कॉंक्रीटीकरणाच्या कामाचा आज शुभारंभ करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, नगरसेवक दिपेश म्हात्रे, कल्याण पूर्व संपर्क प्रमुख शरद पाटील, उपशहर प्रमुख हर्षवर्धन पालांडे, उपशहर अधिकारी कमलाकर चौधरी, शाखा प्रमुख हरीश्चंद्र म्हात्रे, स्थानिक नगरसेविका रेखा राजन चौधरी आदी उपस्थित होते.

## कडोंमपातर्फे १८ वर्षावरील विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात लसीकरण

**कल्याण :** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य यांनी निर्देशित केल्या नुसार युवा स्वास्थ कोविड-19 च्या लसीकरण मोहिमेचे नियोजन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फतही करण्यात येत असून आता महापालिका क्षेत्रातील 18 वर्षावरील महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचेच लसीकरण आता प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन केले जाणार आहे. यासाठी महापालिका क्षेत्रातील महाविद्यालयातून तेथील विद्यार्थी व इतर कर्मचारी वर्गाची यादी प्राप्त करुन त्यानुसार महापालिकेच्या आरोग्य पथकामार्फत त्यांचे लसीकरण 25 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर या कालावधीत केले जाणार आहे.

महापालिका क्षेत्रात आतापर्यंत एकुण 8 लाख 98 हजार 90 नागरिकांनी कोविड लसीची पहिली मात्रा घेतली असून एकुण 4 लाख 49 हजार 46 नागरिकांनी लसीची दुसरी मात्रा घेतली असून आतापर्यंत 13 लाख 47 हजार 136 इतके लसीकरण महापालिका क्षेत्रात झाले आहे. लसीकरणास अधिकाधिक चालना देण्यासाठी भारतातील शंभर कोटी लसीकरण टप्पा पूर्णत्वाचे औचित्य साधून महापालिकेच्या महापालिकेच्या विविध नागरी आरोग्य केंद्रात लसीकरणासाठी आलेल्या शंभराव्या लाभार्थ्याचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला आणि सर्व नागरी आरोग्य केंद्रावर 100 करोड लसीकरण उत्सवाचा टप्पा संपन्न करण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी लसीकरणासाठी नागरिकांना प्रवृत्त करावे

## महापौर नरेश म्हस्के यांचे आवाहन

**ठाणे:** लसीकरण हे राष्ट्रीय काम असून आपल्या आजूबाजूच्या परिसरातील ज्या विद्यार्थ्यांनी लस घेतलेली नाही त्यांना लसीकरणासाठी प्रवृत्त करा असे आवाहनही महापौर नरेश म्हस्के यांनी यावेळी केले.

महापौर नरेश म्हस्के व उपमहापौर पल्लवी कदम यांच्या पुढाकाराने आज विद्या प्रसारक मंडळाच्या के.ग. जोशी कला व ना.गो. बेडेकर महाविद्यालयात मिशन स्वारस्य अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी महापौर बोलत होते. यावेळी नगरसेवक सुधीर कोकाटे, विभागप्रमुख पवन कदम, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीविद्या जयकुमार, पॉलिटेक्नीकच्या प्राचार्या डॉ. डी.के. नायक, ब्रीमचे संचालक डॉ. नितिन जोशी, बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट, जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या डॉ. प्रियमवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, प्राध्यापक नारायण बारसे, स्वप्नील मयेकर, एन.एस.एस युनिटचे डॉ. विनोद चाँदवानी, डॉ. सुदाम अहिरवार आदी उपस्थित होते.



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लसीकरण जलदगतीने व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सूचना येण्याअगोदरच महापौर नरेश म्हस्के यांच्या पुढाकाराने ठाणे महानगरपालिकेने एक पाऊल पुढे जात सर्व महाविद्यालयांमध्ये लसीकरणास सुरुवात केली आहे. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, आनंद विश्व गुरुकुल महाविद्यालय, एन.के.टी महाविद्यालय आदी महाविद्यालयांमध्ये गेल्या आठवड्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लसीकरणास सुरुवात करण्यात आली असल्याचे महापौर नरेश म्हस्के यांनी यावेळी नमूद केले. महाविद्यालयात येणाऱ्या तरुणांनी स्वत:चे लसीकरण झाले नसल्यास ते करुन घ्यावे, तसेच आपल्या मित्रमैत्रिणी व आजूबाजूच्या परिसरातील तरुणांचे लसीकरण झाले नसल्यास किंवा लसीचा दुसरा डोस बाकी असल्यास त्यांना लसीकरणासाठी प्रवृत्त करावे व त्यांना लसीकरण केंद्रापर्यंत घेवून यावे, लसीकरण हे राष्ट्रीय काम असून यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन महापौर नरेश म्हस्के यांनी एन.एस.ए. व एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांना यावेळी केले. ठाणे महापालिकेच्या माध्यमातून15 लाखाहून अधिक लसीकरण झाले आहे, नागरिकांचा लसीकरणास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून तरुणांनी ही लसीकरणास प्रतिसाद द्यावा असेही महापौरांनी नमूद केले.

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# कल्याण-डोंबिवली वैभव

५ ठाणे, मंगळवार, २६ ऑक्टोबर २०२१ | संपादक - मिलिन्द बल्लाळ निवासी संपादक - कुणाल म्हात्रे | www.thanevaibhav.in

**आम्हा घरी धन | शब्दांचीच रत्ने | शब्दांचीच शस्त्रे | यत्ने करु ||**

## पुस्तकवादी नेते व्हावेत

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांची निवड झाली आहे. यामुळे अनेकांच्या भुवया वर गेल्या असतीलही. परंतु अशी भावना मनात आणणे हे राजकारण्यांकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीकोनाने बघण्यासारखे ठरेल. श्री. पवार हे यापूर्वी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष होते. ज्यांनी कधी हातात बॅट वा बॉल धरला नाही त्यांना अध्यक्ष होण्याचा अधिकार कसा रहातो असा नैतिकतेचा सूर आळवला गेला होता. श्री. पवार हे देशाच्या राजकारणातील महत्त्वाचे व्यक्तीमत्त्व असल्यामुळे त्यांच्याबाबत अशी उलट-सुलट चर्चा होतच राहणार.

राजकारण आणि साहित्यसंस्कृती यांची फारकत झाल्यामुळेच की काय पुढारीमंडळींना साहित्य संमेलनात निमंत्रण देण्यापासून ते त्यांच्या देणगीरूपी मेहेरबानीचा स्वीकार करायचा नाही असा सूर उमटत असतो. साहित्य विश्वात नेतेमंडळींनी लुडबुड करू नये, असेच संकेत दिले जात असतात. या पार्श्वभूमीवर श्री. पवार प्रतिष्ठेच्या अशा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष झाले आहेत. यामुळे साहित्यक्षेत्रातील अनेकांची गोची झाली असणार.

नेते वाचत नाहीत, त्यांचा व्यासंग अत्यंत कमी असतो आणि साहित्यामुळे येणारी संवेदनशीलता आणि सुसंस्कृतपणा ते अंगी बाळगत नाहीत, अशी टीका वारंवार होत असते. अर्थात काही नेते त्याला अपवाद असतात. पूर्वीच्या काळी यशवंतराव चव्हाण, नरसिंह राव, अटलबिहारी वाजपेयी, मधू लिमये, ना.ग.गोरे, सुषमा स्वराज, शशी थरूर, अरुण जेटली, आदी नेत्यांची नावे घेता येतील. ही मंडळी सरस्वतीपूजक होती आणि त्याचे प्रत्यय त्यांच्या वक्तृत्वातून आणि एकूण परिपक्वतेतून दिसत असे. दुर्दैवाने ही वाचन परंपरा आता पातळ होऊ लागली आहे. वर्तमानपत्रेही जेमतेम वाचणाऱ्या नेत्यांकडून पुस्तके वाचली जाण्याची अपेक्षा बाळगणे चुकीचे होऊ लागले आहे. किंबहुना पुस्तकावरून वाद उकरून आंदोलनाचे नेतृत्त्व करणाऱ्या नेत्यांनी ते पुस्तकही वाचलेले नसते. वाचनामुळे विचारांना योग्य दिशा मिळणे, सजगता येणे आणि सद्सद्विवेक बुद्धी जीवंत रहाणे असे हेतू सवंगपणात रमणाऱ्या नेत्यांनी कधीच पुसून टाकले आहेत.

श्री. पवार यांच्या निमित्ताने नेत्यांना ग्रंथांशी मैत्री करण्याची संधी प्राप्त झाली आहे. पुढच्या निवडणुकीत पवारांनी आपल्या उमेदवारांनी किती पुस्तके वाचली हा प्रश्न आवर्जून विचारावा. ग्रंथ संग्रहालयाचा अध्यक्ष म्हणून त्यांना तो अधिकार आहेच, पण त्याहीपेक्षा ते स्वतः उत्तम वाचक आहेत आणि त्यांना साहित्य मूल्यांची जाण आहे. यापुढे निदान महाराष्ट्रातील राजकारणी पुस्तकवादी होतील ही अपेक्षा!

# एमएसआरडीसीने वीज बिल न भरल्याने गोविंदवाडी बायपास अंधारात

## काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे आंदोलन




**कल्याण : एमएसआरडीसीने वीज बिल न भरल्याने कल्याण पश्चिमेतील गोविंदवाडी बायपास रस्ता गेल्या महिनाभरापासून अंधारात असून या रस्त्यावरील पथदिवे सुरु करण्याच्या मागणीसाठी काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष सलीम शेख यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.**

कल्याण पश्चिमेतील पत्रिपूल बायपास ते दुर्गाडी किल्ला या गोविंदवाडी रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना नाहक त्रास होत होता. रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. याबाबत काही दिवसांपूर्वी काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाने आंदोलन केल्यानंतर येथील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले होते. मात्र पथदिवे बंद असल्याने या रस्त्यावर अपघात होत आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या पथदिव्यांचे एक लाख 59 हजार 540 रुपये वीजबिल थकविले असल्याने या पथदिव्यांची वीज कापण्यात आली आहे.

एमएसआरडीसी या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करत असल्याने हा रस्ता कडोंमपाकडे हस्तांतरित करुन कडोंमपाने या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाने केली आहे. या मागणीसाठी गोविंदवाडी बायपास मीठ बंदर रोड येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांना बाजारपेठ पोलिसांनी ताब्यात घेत गुन्हे दाखल केले. एमएसआरडीसीने लवकरात लवकर या रस्त्यावरील पथदिव्यांचे थकीत वीजबिल भरुन पथदिवे सुरु न केल्यास याठिकाणी रास्ता रोको करत उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष सलीम शेख आणि उपाध्यक्षा शिफा पावले खटखटे यांनी दिला आहे.

दरम्यान याबाबत एमएसआरडीसीचे अधिकारी अनिरुद्ध बोराडे यांच्याशी संपर्क साधला असता महावितरणचे थकीत वीज बिल आज भरणार असून हा रस्ता कडोंमपाला हस्तांतरित केला असल्याचे सांगितले.

## कोयना एक्सप्रेसच्या प्रवाशांची समस्या सुटली

**कोयना एक्सप्रेसचे डबे आता होणार क्रमाने उपलब्ध**

कल्याण : कोयना एक्सप्रेसचे डबे आता क्रमाने उपलब्ध करुन दिल्याने कल्याणमधील कोयना एक्सप्रेसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची होणारी धावपळ थांबली असून माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. मुंबई कोल्हापुर (कोयना एक्सप्रेस) या गाडीची बोगी रचना इंजिनपासून क्रमाने लागत नसल्याने कल्याणमधील प्रवाशांची धावपळ होत होती.

गाडी सकाळी 9.40 ला कल्याणच्या प्लेटफार्म क्र 4 वर येते. तथापि त्या अगोदर सकाळी 9.30 ला पुष्पक एक्सप्रेस त्याच प्लेटफार्म क्र 4 वरुन सुटते. या दोन्ही गाड्यांमध्ये जेमतेम दहा मिनिट कोयना गाड़ीच्या प्रवाशांना मिळते. त्यात सेकंड क्लासचे प्रवासी जास्त असतात, कधी कधी काही जणांच आरक्षण D-5 मध्ये असते तो एकदम शेवटी येतो आणि त्यांच्याच ग्रुपमधील काहींच D 6 मध्ये असतो तो डबा एकदम पुढे येतो. अगदी 10 मिनिटात प्रवाशांना रोज पुढे मागे धावावे लागते. यात डबे शोधण्यात वेळ लागत असल्याने त्यात अनेकदा प्रवाशांची गाडी सुटत होती.

कल्याणमधील पुण्याला व कोल्हापूरला प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी कल्याणचे माजी आमदार नरेंद्र पवार यांच्याकडे कैफियत मांडली. नरेंद्र पवार यांनी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी मुंबई दौऱ्यात भेट घेऊन प्रवाशांच्या अडचणी मांडल्या. त्यावर दानवे यांनी लागलीच रेल्वे अधिकाऱ्यांना तातडीने लक्ष देण्याचे आदेश दिले. अधिकाऱ्यांनी यावर तातडीने कार्यवाही केल्याने आता कोयना एक्सप्रेसचे डबे क्रमाने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, त्यामुळे कोयना एक्सप्रेसच्या प्रवाशांनी माजी आमदार नरेंद्र पवार यांचे आभार मानले आहेत.

# कडोंमपा क्षेत्रात विशेष स्वच्छता सप्ताहाचा प्रारंभ

**कल्याण : महापालिकेच्या कायापालट अभियानात सामाजिक संस्था, नागरिकांनी सहभाग घेतल्यास शहर अधिक स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होईल, असे उद्गार महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज काढले.**

महापालिका परिसर महापालिकेच्या नागरिकांसाठी स्वच्छ व सुंदर व्हावा याकरीता महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतून ऑक्टोबरमध्ये महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी राबविल्या जाणा-या कायापालट अभियानांतर्गत 25 ते 31 ऑक्टोबर दरम्यान राबविल्या जाणा-या "विशेष स्वच्छता सप्ताहाचा" प्रारंभ आज सकाळी 7 वाजता महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा प्रमुख उपस्थितीत खडकपाडा सर्कल येथे झाला.

या विशेष स्वच्छता मोहिमेच्या वेळी घकव्यचे उपआयुक्त रामदास कोकरे, महापालिका सचिव संजय जाधव, सहायक सार्वजनिक अधिकारी अगुस्तीन घुटे, ब प्रभाग सहायक आयुक्त चंद्रकांत जगताप, उप अभियंता प्रविण पवार, सहा जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, उद्यान अधिक्षक अनिल तामोरे व अन्य अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होता. रिव्हर साईड रोटरी क्लब ऑफ कल्याण आणि रवी पाटील फाऊंडेशनच्या सदस्यांनी सुध्दा या विशेष स्वच्छता मोहिमेत आपला सहभाग दर्शविला.



आजची विशेष स्वच्छता मोहिम खडकपाडा सर्कल ते संदीप हॉटेल पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला राबवण्यात आली. आपले शहर स्वच्छ व सुंदर राहावे ही जबाबदारी महापालिकेची आहेच, तशी नागरिकांची देखील आहे. नागरिकांनी देखील रस्त्यावर कचरा टाकणे टाळावे आणि आपला कचरा महापालिकेच्या घंटागाडीतच द्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्तांनी यावेळी केले.

# सोनारपाडा येथील पाणीपुरवठा सुरळीत करण्याची रिपाइंची मागणी

**डोंबिवली : डोंबिवलीजवळील सोनारपाडा येथे अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने यावर लक्ष देत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे डोंबिवली शहर अध्यक्ष अंकुश गायकवाड यांनी पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र दिले आहे.**

सोनारपाडा गावामध्ये आठवड्यातून दोन दिवस कमी दाबाने पाणी सोडण्यात येते. त्यामुळे या भागात तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. विशेष म्हणजे काही भागात अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा केला आहे. पाणी वितरण करण्याकडे पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून भेदभाव होत असल्याचे पत्रात म्हटले आहे.

अशा कर्मचाऱ्यांवर पालिकेने कायदेशीर कारवाई करावी. आनंद जाधव व चंद्रकांत जाधव यांच्या मालकी हक्काची जागा पालिकेला पाण्याची टाकी बांधण्याकरिता दान केली आहे. असे असताना गावकऱ्यांना पाणी व्यवस्थित मिळत नाही अशी खंत गायकवाड यांनी व्यक्त केली.

येत्या चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत झाला न झाल्यास डोंबिवली शहर अध्यक्ष अंकुश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

# २७ गावातील पाणीप्रश्नाकडे भूमिपुत्र पार्टीने वेधले आयुक्तांचे लक्ष

**समस्या न सुटल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा दिला इशारा**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील 27 गावांमध्ये पिण्याची समस्या गंभीर झाली असून याबाबत भूमिपुत्र पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रकांत मोटे यांनी निवेदनाद्वारे पालिका आयुक्तांचे लक्ष वेधले आहे. त्याचप्रमाणे 27 गावांमध्ये इतर सोयी सुविधा पुरविण्यास पालिका असमर्थ ठरत असल्याने अवास्तव मालमत्ता कर कमी करण्याची मागणी देखील आयुक्तांकडे करण्यात आल्या असून या मागण्या मान्य न झाल्यास बुधवारी याबाबत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.

कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेतील ग्रामीण भागातीत 27 गावे शासन निर्णयामुळे समाविष्ट करण्यात आली आहेत. परंतु सदर 27 गावांमधील दावडी, सोनारपाडा आदी गावातील नागरिक पिण्याचे पाणी, दिवाबत्ती, रस्ते आदी सुविधांपासून वंचित आहेत. पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नसल्याने येथील नागरिक दररोज खाजगी टँकरने पाणी खरेदी करतात. यामुळे कोरोना महामारीमुळे देशोधडीला लागलेल्या ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात आलेल्या कूपनलिका नादुरुस्त असल्याने तसेच काही ठिकाणी या कुपनलिकेतून येणाऱ्या पाण्यामध्ये अळ्या येत असल्याने नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. 27 गावांतील नागरिकांना पुरेशा सोयी सुविधा मिळत नसतांना देखील पालिकेच्या वतीने अवास्तव मालमत्ता कराची वसुली केली जात असून हा मालमत्ता कर कमी करावा आणि पाण्याची समस्या त्वरित न सोडविल्यास बुधवारी तीव्र आंदोलन करून महापालिकेवर मोर्चा काढत आमरण उपोषण करण्याचा इशारा भूमिपुत्र पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रकांत मोटे यांनी दिला आहे.

# पाणी टंचाईने हैराण झालेल्या नागरिकांचा मोर्चा

## माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांनी विचारला जाब



डोंबिवली : गेले अनेक दिवस डोंबिवली व ग्रामीण भागात पाणीप्रश्न अधिकच गंभीर बनत चालला आहे. ग्रामीण भागातील दावडी येथील काही रहिवाशांनी हंडा-कळशी वाजवून प्रशासनाचा निषेध केला. तर आजदेपाडा येथे पाणी वितरण व्यवस्थेत भेदभाव केला जात असल्याचा आरोप करत रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली.

डोंबिवली पश्चिमेकडील गरीबाचा वाडा आणि राजूनगर प्रभागात अनेक दिवसांपासून पाणी टंचाईने हैराण झालेल्या नागरिकांनी सोमवारी डोंबिवलीतील पालिकेच्या `ह`प्रभाग क्षेत्र कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी भाजपचे माजी नगसेवक विकास म्हात्रे यांनी रहिवाशांना घेऊन पाणीपुरवठा विभागाचे अभियंता अनिरुद्ध सराफ यांची भेट घेऊन जाब विचारला.

कर भरुनही पाणी मिळत नसल्याने हा प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक नागरिकांनी माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांनी भेट घेऊन आपली समस्या मांडली. स्थानीक नगरसेवक म्हात्रे यांनी रहिवाश्यांचे म्हणणे ऐकून अनेक वेळेला पालिका प्रशासनाला पत्रव्यवहार केला. गेली दोन ते तीन वर्ष सातत्याने लेखी तक्रार केली होती. गरीबाचा वाडा, कुंभारखानपाडा आणि राजुनगर येते अत्यंत कमी दाबाने अनियमित पाणी पुरवठा होत असल्याने येथील रहिवाशी पुरते वैतागले आहेत. लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरळीत न झाल्यास जनआंदोलन करू असा इशारा माजी नगरसेवक म्हात्रे यांनी पालिकेला दिला होता. पालिका प्रशासनाने पाणी प्रश्न सोडविला नसल्याने अखेर माजी माजी नगरसेवक म्हात्रे यांच्यासह नागरिकांनी पालिकेच्या डोंबिवलीतील `ह` प्रभाग क्षेत्र कार्यालयावर मोर्चा काढला. पाणी पुरवठा विभागाचे अभियंता अनिरुद्ध सराफ यांची भेट घेऊन माजी नगरसेवक म्हात्रे यांनी जाब विचारला. तर डोंबिवली पाणी पुरवठा विभाग कार्यकारी अभियंता किरण वाघमारे यांचीही भेट घेऊन म्हात्रे यांनी पाणी प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी विनंती केली. पाणी पुरवठा विभागाचे अभियंता सराफ यांनी आपल्या विभागासाठी नवीन जलवाहिनी टाकली असून येत्या आठ दिवसात पाणी पुरवठा सुरळीत केला जाईल असे आश्वासन दिले.

# दोन वर्षाच्या चिमुकलीने केले सह्याद्री पर्वत रांगेतील किल्ले सर



कल्याण : दोन वर्षाच्या चिमुकलीने सह्याद्री पर्वत रांगेतील किल्ले सर केले असून चिमुकल्या प्रचिती घरतने अलंग, मदन आणि कुलंग या कठीण किल्ल्यांवर चढाई केली आहे.

**| चिमुकल्या प्रचिती घरतची अलंग मदन आणि कुलंग किल्ल्यावर चढाई**

अलंग, मदन आणि कुलंग म्हणजे सह्याद्रीच्या कुशीत सुमारे 4500 हजार फूट पेक्षाही अधिक उंचीवर वसलेले हे तीन किल्ले आहेत. इगतपुरीच्या आंबेवाडी या पायथ्याशी असलेल्या गावापासून गड सर करण्यासाठी सुरुवात होते. भल्याभल्या मोठ्यांच्या शौर्याची परीक्षा घेणारे हे तीन किल्ले मात्र वय वर्ष दोन असणाऱ्या प्रचिती घरत ह्या चिमुरडीने ने "सह्याद्री रॉक ॲडव्हेंचर" ह्या समूहाच्या मदतीने मात्र सहज सर केले. दोन दिवसांच्या ह्या मोहिमेत प्रचितीने क्लाइंबिंग आणि राप्पेल्लिंग सारख्या अवघड आणि मोठमोठ्यांना सुद्धा थरारून सोडणाऱ्या गोष्टी सह्याद्री रॉक ॲडव्हेंचर ह्यांच्या मार्फत आरामात करून घेतल्या.

आंबेवाडीपासून सुमारे दोन तासांची पायपीट आणि चढण करून गडाच्या पायथ्याशी पोहचता येते. तिथून चालू होतो गड सर करण्याचा खरा थरार. अलंग, मदन आणि कुलंग मोहीम यशस्वी करून दाखवताच प्रचितीने ही मोहीम पूर्ण करणारी सर्वात लहान गिर्यारोहक बनण्याचा मान पटकावला. ह्या आधीही सह्याद्री रॉक ॲडव्हेंचरची मोहीम पार पाडली होती. या मोहिमेत सह्याद्री रॉक ॲडव्हेंचरचे पवन घुगे, दर्शन देशमुख, रणजित देशमुख, भूषण पवार आणि अक्षय जमदारे सहभागी झाले होते. प्रचीतीला प्रत्येक मोहिमेत सहकार्य करणार असे यावेळी सह्याद्री रॉक ॲडव्हेंचरच्या वतीने सांगण्यात आले.

# द्वारली पाडा येथील लसीकरण शिबिरात २२९ नागरिक लाभान्वित



कल्याण : संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने रविवारी शहापूरसारख्या आदिवासी तालुक्यात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये 81 निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. मिशनच्या शहापूर, वासिंद आणि कसारा या शाखांमधील निरंकारी भक्तगणांनी 'माझ्या नसानसातून वाहते मानवता' या उदात्त भावनेने मोठ्या उत्साहाने या शिबिरात भाग घेतला. जे.जे.महानगर रक्तपेढी, मुंबई यांनी या शिबिरात रक्त संकलन केले.

या शिबिरामध्ये संत निरंकारी मंडळाच्या डोंबिवली झोनचे क्षेत्रीय प्रभारी रावसाहेब हसबे, सेवादल क्षेत्रीय संचालक जनार्दन म्हात्रे, कल्याणचे सेक्टर संयोजक जगन्नाथ म्हात्रे तसेच वासिंद व कसारा शाखांचे मुखी नितिन ढगे व शांताराम ठवले यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचा उत्साह वाढविला. शहापूर शाखेचे मुखी शैलेंद्र सकपाळे आणि शहापूर सेवादल युनिटचे संचालक यतीन भोईर यांनी शिबिराच्या आयोजनामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले.

# विद्यार्थी भारती संघटनेची तालिबानी सरकारच्या विरोधात मोहीम सुरू


**कल्याण : अफगाणिस्तानात तालिबानी सरकारने महिलांचे शिक्षण बंद करून बुरखा हेच त्यांचं जग व चूल आणि मुलं हेच त्यांचे अस्तित्व इतकं मर्यादित करण्याची मजल तालिबान सरकारची वाढली आहे. याचा मोठ्या प्रमाणात निषेध झाला नाही तर हीच परिस्थिती जवळपासच्या देशात लवकरच पाहायला वेळ लागणार नाही असे मत विद्यार्थी भारती राष्ट्रीय अध्यक्षा मंजिरी धुरी यांनी व्यक्त केले.**

विद्यार्थी भारतीच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील शाळा-कॉलेजांमध्ये, वस्त्यांमध्ये जाऊन अफगाणमधील या परिस्थितीबद्दल तरुणांसोबत चर्चा करून या निरर्थक निर्बंधांच्या विरोधात निषेध नोंदवत #I_am_with_afgan_girl ही मोहीम सुरु केली असल्याची माहिती विद्यार्थी भारती राज्यध्यक्षा पूजा मुधाने यांनी दिली.

या मोहिमेला मोठ्या प्रमाणात मुंबईतील तरुणांनी पाठिंबा दिला असून देशातील तमाम विद्यार्थ्यांनी या लढ्यात सामील व्हावे असे आवाहन विद्यार्थी भारतीच्या कार्यकर्त्यांनी केल्याचे विद्यार्थी भारती राज्यकार्यवाह आरती गुप्ता यांनी सांगितले.

# महाराष्ट्रासह मध्य प्रदेशात सापडला करोनाचा नवा व्हेरिएंट

**नवी दिल्ली : मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात सार्स कोविड 2 च्या डेल्टा प्रकारांची सबलाइनर प्रकरणे आढळून आल्यानंतर भारताचा करोना जीनोमिक सर्व्हिलन्स प्रोजेक्ट हाय अलर्टवर आहे. नॅशनल सेंटर ऑफ डिसीज कंट्रोल कडून जारी करण्यात आलेल्या जीनोम सिक्वेन्सिंग अहवालात इंदूरमध्ये नवीन कोविड प्रकारच्या एवाय.4 – डेल्टा व्हेरियंटची सात प्रकरणे आढळून आली आहेत. त्यापैकी दोन महू कॅन्टोन्मेंटमध्ये तैनात असलेले लष्करी अधिकारी आहेत, असे इंदूरचे मुख्य वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी डॉ बीएस सैत्य यांनी सांगितले आहे. सप्टेंबरमध्ये यांचे नमुने घेण्यात आले होते.**



जीनोम सिक्वेंसींग रिपोर्टमध्ये इंदूरसह महाराष्ट्रात करोना चाचण्यांच्या एक टक्के नमुन्यांमध्ये नवीन डेल्टा एवाय.4 प्रकार आढळला आहे. नवीन प्रकार डेल्टा स्ट्रेनपेक्षा अधिक संसर्गजन्य आणि अधिक प्राणघातक असू शकतो असे शास्त्रज्ञांनी सूचित केले आहे. एवाय 4.2 नावाचा नवीन व्हेरिएंटला आता ब्रिटनमध्ये तपास अंतर्गत आवृत्ती म्हणून घोषित करण्यात आले आहे. आरोग्य संस्थेने आपल्या अहवालात म्हटले आहे की, एवाय.4.2 डेल्टा व्हेरिएंट सर्व प्रकरणांमध्ये सुमारे सहा टक्के आहे. डेल्टा हा व्हेरिएंट घातक आहे. एवाय.4.2 नावाचा डेल्टा व्हेरिएंट हा इंग्लंडमध्ये पसरला होता," असे अहवालात म्हटले आहे.

एवाय.4.2, ज्याला "डेल्टा प्लस" म्हणतात आणि आता यूके हेल्थ प्रोटेक्शन एजन्सीद्वारे व्हीयूआय-21ऑक्टोबर-01 असे नाव देण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांत त्याची चाचणी केली केली असता, तो मुख्य डेल्टा आवृत्तीपेक्षा अधिक वेगाने पसरत असल्याचे समोर आले आहे. एनसीडीसी अहवालात असे म्हटले आहे की या व्हेरिएंटमुळे सप्टेंबरमध्ये इंदौर जिल्ह्यात कोविड-19 ची वाढ झाली होती. ऑगस्टमध्ये करोना संसर्ग 64 टक्क्यांनी वाढला होता.

यूके हेल्थ प्रोटेक्शन एजन्सी, सार्स कोविड -2 च्या प्रकाराशी संबंधित सर्व उपलब्ध माहितीचे परीक्षण करण्यात येत आहे, ज्यामुळे ब्रिटनमध्ये करोनाचा प्रसार वाढला होतो. एवाय.4.2 हे उत्परिवर्तनांच्या त्याच प्रकारातील आहे जो गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये भारतात प्रथम आढळला होता. नवीन डेल्टा प्रकारामुळे देशात प्रकरणांची दुसरी लाट आली होती.

# २० लाख लोकांना रोजगार, १० लाखांपर्यंत मोफत उपचार आणि बरंच काही!

## उत्तरप्रदेशात प्रियंका गांधींकडून आश्वासनांचा पाऊस

उत्तर प्रदेश : उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी घोषणा केली आहे की, पक्ष राज्यात सरकार स्थापन झाल्यावर 10 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आणि आरोग्य सुविधा देईल.

एका ट्विटमध्ये प्रियंका गांधी म्हणाल्या, "कोविड-19 महामारीच्या काळात उत्तरप्रदेशातील आरोग्य व्यवस्थेची ढासळलेली स्थिती प्रत्येकाने पाहिली, जी सध्याच्या सरकारच्या उदासीनतेचा आणि दुर्लक्षाचा परिणाम आहे. उत्तरप्रदेश काँग्रेसने ठरवले आहे की, जेव्हा उत्तरप्रदेशमध्ये जेव्हा काँग्रेसचे सरकार येईल तेव्हा कोणत्याही आजारावर मोफत उपचार केले जातील. 10 लाख रुपयांपर्यंतचा खर्च सरकार उचलणार आहे. याआधी, प्रियंका गांधी यांनी उत्तर प्रदेशच्या बाराबंकी येथून



काँग्रेसच्या "प्रतिज्ञा यात्रे" ला झेंडा दाखवला होता, ज्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि पुढील वर्षी विधानसभा निवडणुकीत सत्तेवर आल्यास 20 लाख लोकांना नोकऱ्या देण्यासह सात आश्वासने दिली होती. काँग्रेसने गहू आणि धान खरेदी 2,500 रुपये प्रति क्विंटल आणि उसाला 400 रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्याचे आश्वासन दिले आहे. 20 लाख लोकांना नोकऱ्या देण्याव्यतिरिक्त, प्रियंका गांधींनी सांगितले की जर राज्यात काँग्रेस सत्तेवर आले तर त्यांचा पक्ष सर्वांचे वीज बिल अर्ध्यावर आणेल.

काँग्रेस महिलांना 40 टक्के तिकिटे देणार असल्याचा पुनरुच्चार करून महिलांसाठी वेगळा जाहीरनामा आणेल, असेही त्या म्हणाल्या. सत्तेत आल्यास 12 वी उत्तीर्ण मुलींना स्मार्टफोन आणि पदवीधर मुलींना ई-स्कूटर देणार असल्याचा पुनरुच्चारही पक्षाने केला. कोविड संकटामुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या कुटुंबांना 25,000 रुपये देणार असल्याचे पक्षाने म्हटले आहे. प्रियंका यांनी आठवड्याभरात महिलांसाठी स्वतंत्र घोषणापत्र देण्याचे आश्वासन दिले आणि राजकारणात त्यांचा सहभाग आवश्यक असल्याचे सांगितले.

# खासगी लसीकरण केंद्रांकडे पाठ; लस उपलब्धता वाढल्याने प्रमाणात घट



**मुंबई : लसमात्रांची उपलब्धता वाढल्यामुळे ऑक्टोबरमध्ये खासगी लसीकरण केंद्रांवरील नागरिकांचा ओघ घटला आहे. दर दिवशी संपूर्ण मुंबईत होणाऱ्या लसीकरणापैकी जेमतेम 20 टक्के लसीकरण खासगी केंद्रांवर होत आहे.**

मुंबईत शनिवारी दिवसभरात 74 हजारांहून अधिक लोकांचे लसीकरण झाले. त्यात केवळ 10 हजार 500 नागरिकांनी खासगी लसीकरण केंद्रांवर लस घेतली. मुंबईत आतापर्यंत 1 कोटी 38 लाखांहून अधिक नागरिकांनी लस घेतली आहे. यापैकी 50 लाखांहून अधिक जणांनी दुसरी मात्रा, तर 87 लाखांहून अधिक नागरिकांनी पहिली मात्रा घेतली आहे. सुमारे 97 टक्के नागरिकांनी पहिली मात्रा घेतली आहे. तर 55 टक्के नागरिकांनी लशीची दुसरी मात्रा घेतली आहे.

### पालिकेच्या केंद्रांवर

गेल्या महिन्याभराचा विचार करता पालिकेच्या केंद्रांवर सुमारे 15 लाख 83 हजार 217 लोकांचे लसीकरण करण्यात आले, तर खासगी केंद्रावर फक्त 4 लाख 78 हजार 285 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले.

त्यातही उच्चभ्रू, सुशिक्षित वर्गाचे बहुतांशी लसीकरण झालेले असल्यामुळे खासगी लसीकरण केंद्रांवरील गर्दी आटली आहे.

18 ते 45 या वयोगटांसाठी लसीकरण सुरु झाले त्यानंतर मुंबईत जुलै व ऑगस्टमध्ये लशीचा मोठा तुटवडा निर्माण झाला होता. या काळात पालिकेच्या व सरकारी लसीकरण केंद्रांवर मोफत लस मिळत होती. तर खासगी लसीकरण केंद्रांवर मात्र लसमात्रा विकत घ्यावी लागत होती. पालिकेच्या लसीकरण केंद्रांवर रांगा लावाव्या लागत होत्या. अनेकांची दुसरी लस मात्रा घेण्याची मुदत उलटून जात होती. त्यामुळे नागरिक मोठ्या संख्येने खासगी लसीकरण केंद्रांकडे वळले होते. त्यामुळे सप्टेंबपर्यंत खासगी लसीकरण केंद्रांवर गर्दी वाढली होती. लसीकरणाचा टक्का वाढवण्यासाठी पालिकेने घेतलेल्या मोहिमांमुळे आता बहुतांशी लोकांची पहिली मात्रा घेऊन झाली आहे. त्यामुळे सध्या पालिकेच्या लसीकरण केंद्रांवरही सहज लस उपलब्ध होत असल्यामुळे साहजिकच खासगी लसीकरण केंद्रांवरील गर्दी आटली आहे.

# ऐन दिवाळीत एसटी प्रवास महागला, तब्बल 17 टक्क्यांनी तिकीट दरात वाढ

मुंबई : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीने तिकीट दरात वाढ करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. एसटीच्या तिकिटामध्ये तब्बल 17 टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. या तिकीट वाढीमुळे आता एसटीचा प्रवास महागणार असून आज (25 ऑक्टोबर) मध्यरात्रीपासून नवे दर लागू होतील.

गेल्या काही महिन्यांपासून इंधनाच्या दरात भरमसाठ वाढ वाढ झाली. इंधन महागल्यामुळे आर्थिक गणितं जुळवताना एसटी महामंडळाची दमछाक होत होती. त्यामुळे आता ऐन दिवाळीच्या हंगामात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बस तिकिटांच्या दरात वाढ करण्यात आली आहे. दीपावली हा सण साजरा करण्यासाठी चाकरमाने शहरातून आपापल्या गावी जातात. प्रवाशांची मोठी गर्दी असते. असे असतानाही एसटीच्या तिकीट दरात तब्बल 17 टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. एसटीची यापुर्वीची भाडेवाढ जून 2018 मध्ये झाली होती. दरवाढीनंतर गेल्या दोन वर्षात डिझेलच्या दरात 25 रुपये वाढ झालीय.

## पंतप्रधान मोदी लाँच करणार 64 हजार कोटींची हेल्थ इन्फ्रा स्कीम

नवी दिल्ली : देशभरातील आरोग्य सेवा पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 64,180 कोटी रुपयांची प्रधानमंत्री आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजना लाँच करणार आहेत. प्रधानमंत्री आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजना ही संपूर्ण भारतातील आरोग्य सेवा पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी देशातील सर्वात मोठ्या योजनांपैकी एक असेल.

याशिवाय सिद्धार्थनगरमध्ये पंतप्रधान उत्तर प्रदेशातील नऊ वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्घाटन करतील. ते वाराणसीसाठी 5200 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटनही करतील. पीएमएएसबीवायचे उद्दिष्ट शहरी आणि ग्रामीण भागांमधील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांमधील असलेली तफावत दूर करणे हे आहे.


### जाहीर नोटीस

तुलसी आरंभ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पत्ता : खरवई, बदलापूर पू. जि. ठाणे या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत सरला सूचक यांचेसोबत सहमालक म्हणून सदनिका क ५०४, पाचवा मजला, ई विंग क्षेत्र ३९.११ चौ. मी कारपेट ही मालमत्ता व भाग पत्र क. १२५ व १२४१ ते १२५० असे भाग धारण करणा-या श्री. विरेंद्र कानजी सूचक यांचे तारीख ११/०५/२०२० रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केले नाही. त्यांचे पश्चात त्यांची वरीलनामे पत्नी व मुलगी कु. पूजा विरेंद्र सूचक हे त्याचे कायदेशीर वारस आहेत. मुलगी कु. पूजा विरेंद्र सूचक हिने मयत विरेंद्र कानजी सूचक यांचे नाव कमी करून त्यांचे नाव मालमत्तेस लावण्यासाठी संस्थेकडे अर्ज केला आहे. संस्था या नोटीशीव्दारे संस्थेच्या मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे या व्यतिरिक्त असलेले वारसदार किंवा अन्य मागणीदार /हरकतदार यांचेकडून हक्क मागण्या /हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पृष्टर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे संध्याकाळी ७ ते ९ पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण** : बदलापूर सही/-
**दिनांक** : २३/१०/२०२१ **सचिव**
तुलसी आरंभ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., यांचेकरीता व वतीने

### जाहीर नोटीस

जाहीर नोटीस देण्यात येते की माझे पक्षकार यांचे वतीने व कथनानुसार खालील परीशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे टायटल तपासणी करिता प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सबब कोणाही व्यक्तींचे सदर परिशिष्ट मिळकतीबाबत काही एक हरकत, तक्रार, तंटा असल्यास किंवा कोणत्याहीप्रकारचे हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर सबळ कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी कळवावे. अन्यथा सदर मिळकत बोजे विरहीत असे समजण्यात येईल.

परिशिष्ट
वागळे इंडस्ट्रीयल एरिया, रोड नं.१६, ठाणे (पश्चिम), तालुका व जिल्हा ठाणे तसेच ठाणे महानगरपालिका हद्दीतील प्लॉट क्र. सी-३, क्षेत्र ४३७० चौ. मी. व त्यावरील कारखाना इमारत येणेप्रमाणे.

**(आर.डी.राशीनकर)**
**वकील**
१०१, ऐश्वर्यलक्ष्मी अपार्टमेंट,
महर्षी कर्वे रोड, नामदेववाडी,
सभागृहासमोर, ठाणे (प.)-२
ठाणे, दिनांक: २६/१०/२०२१


# गोंधळसत्र सुरूच! आरोग्य भरती परीक्षेचे ढिसाळ नियोजन

**मुंबई : आरोग्य विभागातील भरती प्रक्रियेतील गोंधळ प्रत्यक्ष परीक्षेच्या दिवशीही कायम राहिला. विभागाच्या 'क' गटातील पदांसाठी रविवारी झालेल्या परीक्षेत मुंबई, पुणे, नागपूर, नाशिकसह राज्यातील अनेक ठिकाणी प्रश्नपत्रिका मिळण्यात विलंब, चुकीच्या पदाच्या प्रश्नपत्रिका, असा ढिसाळ नियोजनाचा अनुभव विद्यार्थ्यांना आला. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या घोळानंतर परीक्षेच्या दिवशीही गोंधळ झाल्याने उमेदवारांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली.**

आरोग्य विभागांतर्गत वर्ग 'क' आणि 'ड' वर्गाच्या परीक्षा घेण्याची जबाबदारी दिल्लीतील न्यासा कम्युनिकेशन्स कंपनीकडे सोपविण्यात आली आहे. ही कंपनी निविदा प्रक्रियेतून निवडण्यात आली असून, गेल्या महिन्यात या परीक्षा होणार होत्या. मात्र, गेल्या महिन्यात न्यासाने पुरेशी परीक्षा केंद्रे उपलब्ध करून न दिल्यामुळे ऐनवेळी आरोग्य विभागाच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या होत्या. त्यावेळी परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांची आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी माफी मागितली होती.


### भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**बांधकाम विभाग**

**ई–निविदा सुचना क्र. १४०/२०२०–२१**

भिवंडी नि शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग मार्फत नमुद कामाचे ई–निविदा फॉर्म mahatenders.gov.in या संकेतस्थळावर विक्रीस उपलब्ध आहेत. अधिक माहिती भि.नि.श.म.पा. नविन शासकीय इमारतीमध्ये ५ मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

निविदा विक्री दि. २६/१०/२०२१ ते दि. ०९/११/२०२१
सादरीकरण दि. १०/११/२०२१

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी वाहतुकीचे साईन बोर्ड तयार करणे. | ०७,२६,७६८/– | ५२५/– |

सही/–
(एल.पी. गायकवाड)
शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

### जाहिर नोटीस

तमाम जनतेला कळविण्यात येते की, आमचे अशील ब्राम्हण को.ऑप. हौसिंग सोसा. लि. हे प्लॉट नं. २४, टिक्का नं. ११ ज्याचे क्षेत्रफळ ४६१.८० चौ. फुट इतके असून आमचे अशिल त्याचे मुळ मालक आहेत. त्यांनी सदर भूखंड हा जोशी यांना सब लिज केला होता. त्याअनुषंगाने श्री. जोशी यांना संस्थेने भागप्रमाणपत्र वितरीत केले होते. त्यानंतर सदर भूखंड हा विजया मनोहर भावे यांच्या नावे सबलिज केला गेला. दरम्यानच्या काळात सदर भूखंडाच्या अनुषंगाने वितरीत केलेले भागप्रमाणपत्र गहाळ झाले आहे.

तरी सदर भागप्रमाणात कोणास प्राप्त झाले असल्यास, तसेच त्या अनुषंगाने कुणाची हरकत, दावा, तक्रार, तारण, गहाण, दान, बोजा, पोटगी वा अन्य तत्सम कोणत्याही बोजाचा, वहिवाटीचा दावा असल्यास त्या व्यक्तींनी/ संस्थांनी त्यांच्याकडे असणाऱ्या कागदोपत्रांसह लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यांवर सादर करावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती, दाव्यांची दखल घेतली जाणार नाही व संस्था त्याबाबत योग्य ती पुढील कारवाई सुरू करेल याची कृपया नोंद घ्यावी.

वर उल्लेख केलेल्या सदर भागप्रमाणपत्राच्या अनुषंगाने काही संपर्क साधावयाचा असल्यास पुढील पत्त्यावर साधावा. ही जाहीर नोटीस जनहितार्थ प्रसिद्ध केली.

संपर्काचा पत्ता –
द्वारा घैसास अँड असोसिएटस्,
२/ए, चंदन सोसायटी, किर्तीकर कंपाउंड,
नुरी बाबा दर्गा रोड, मखमली तलावाजवळ,
ठाणे (प)–४००६०१
दुरध्वनी : ०२२–२५४०१८१३, २५४१६३३६
भ्रमणध्वनी – ९८६९०८०७१४, ९८६९२८३३२४

सही/–
(श्रीनिवास भा घैसास)
वकील उच्च न्यायालय

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या जीवरसायनशास्त्र विभागासाठी विविध प्रकारच्या आजारावर निदान करणेसाठी आवश्यक असणारी विविध प्रकारची कार्टेज व रसायने (कीट) खरेदी करणेसाठी द्विवार्षिक सन २०२१-२२ व २०२२-२३ निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in. दि.२६.१०.२०२१ ते दि.०८.११.२०२१ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.०८.११.२०२१ रोजी १६.३० वाजेपर्यंत ऑन लाईन निविदा स्विकारणेत येतील. दि.१२.११.२०२१ रोजी १६.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑन लाईन उघडण्यात येतील.

ठामपा /पिआरओ/अधिष्ठाता/७९९/२१-२२ **सही/-**
दि.२५.१०.२०२१ अधिष्ठाता
*plsvisitourofficialweb-site* छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व
*www.thanecity.gov.in* राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

**FORM N.D.**
**[See rule 92(3)]**
**Form of Notice to be published in Newspaper by the successor to the Permit holder.**

It is hereby informed for the knowledge of public that Shri **Dnyaneshwar L Patil** owner of the Motor Vehicle No. MH-04-HZ-7336 covered by permit No.MH/4/CC/Auto/2018/2579 has expired on 02/03/2023.

I **Shrimati Jyoti Dnyaneshwar Patil** address- Desai Vetal Pada, Po. Padale Marathi School, No. 87, Thane. being the successor to the abovementioned to confer intend to use the permit and accordingly, I have applied to the appropriate authority/Regional Transport Office/Regional Transport Authority for the transfer of permit in my name.

Any person having any claim or objection in this regard, should within 15 days from the publication of this Notice, being such fact to the notice of Regional Transport Office/Regional Transport Authority Thane.

**Sd/-**
Name of the successor
**Shrimati Jyoti Dnyaneshwar Patil**
Address:- Desai Vetal Pada, Po. Padale Marathi School, No. 87, Thane.

### निविदा सुचना

पेंट आणि डब्ल्यूपी मॅन्युफॅक्चरिंग कंपनीच्या रजिस्टर विक्रेत्यांकडून स्वस्तिक पाम्स सी.एच.एस.एल. ब्रम्हांड, ठाणेच्या जी+७ च्या ८ इमारतींना दुरूस्ती, पेंटिंग आणि संलग्न कामासाठी सीलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा हायलाइटस् खालील लिंक दुव्यावर पाहिल्या जाऊ शकतात. https://sites.google.com/view/swastikpalmschsl/home

**For SWASTIK PALMS CO-OP.HSG. SOC. LTD.**
**CHAIRMAN**
**Regd No. TNA/(TNA)/HSG/TC/18180/07**
**DT.20/02/07**

### CLASSIFIEDS ठाणेवैभव

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय**
**ठाणे - २५३४१५२६/२५३४८५९४**

**ऑफिस भाड्याने देणे आहे**
टोटल कार्पेट एरिया, ११५८.६७ स्क्वे.फु., ३ कॅबिन, १ रिसेप्शन, १ पॅन्ट्री, २ बाथरूम टेरेस सोबत शिवनेरी बिल्डिंग, पहिला माळा, गावदेवी, ठाणे रेल्वे स्टेशनजवळ. ८९७६८२३७५२

**विकणे आहे**
टेंभी नाका परिसरात २०० आणि २५० चौ.फूटाचा बेसमेंट गाले विकायला आहे.
संपर्क – ९८१९२४९२८०

**पाहिजेत**
नामांकित रक्तपेढीसाठी डिलेव्हरीसाठी (बाईक असणाऱ्यास प्राधान्य) मुले पाहिजेत. पत्ता – ब्लडलाईन ब्लड बँक, आंबेडकर रोड, खोपट, ठाणे (प)
संपर्क – ०२२–२५३७५०००/ ६०००

**WANTED**
Male Accounts Assistant 12th or Graduate pass for a Showroom at Thane0
Contact : 9820441155 or 9820118786

**Change of Name**
I have change my name from Shawar Ahmed Sartaj Ahmed Khan to Shawar Sartaj Khan as per gazatte no. M2194630

**Change of Name**
I have change my name from Ujjwala Chandranant Ambike to Mrs. Anuradha Shyam Ghodke as per affidavit

**भाड्याने देणे आहे**
हिरनंदानी मिडोजजवळ ५७८ स्क्वे.फुट. चा १ बीएचके फ्लॅट त्वरीत भाड्याने देणे आहे.
संपर्क– हेमंत सरेकर
मो.नं. ९७५७४४२७६१

**'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.**

### ठाणे शहर पोलीस एम्प्लॉईज को–ऑप क्रेडिट सोसायटी लि., ठाणे

**(नोंदणी क्रमांक ११७३/१९१६ दि. २९/८/१९१६)**
**ठाणे शहर पोलीस आयुक्त कार्यालयाच्या बाजूला, क्रिक रोड, ठाणे (प.)**
**४००६०१ फोन नं. २५४४०३१८**

**वार्षिक सर्वसाधारण सभा अजेंडा**

ठाणे शहर पोलीस एम्लॉईज को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. ठाणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २९/१०/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. श्री. सुनिल तु. मोरये यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून (Zoom ॲपद्वारे ऑनलाईन) संस्थेच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी कृपया वेळेवर ऑनलाईन उपस्थित रहावे.

**सभेपुढील विषय खालीलप्रमाणे**

१. दि. ३१/०३/२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचूनकायम करणे.
२. सन २०२०–२०२१ चे आर्थिक पत्रकांना मंजुरी देणे.
३. कार्यकारी मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा विभागणीस मंजुरी देणे.
४. वैधानिक लेखापरीक्षण अहवाल २०२०–२१ ची नोंद घेणे.
५. सन २०१९–२० च्या दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
६. सन २०२१–२२ चे अंदाजपत्रकाला मंजुरी देणे तसेच २०२०–२१ चे अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चांना मंजुरी देणे.
७. सन २०२१–२२ या सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक व मेहनतान्यास मंजुरी देणे.
८. सन २०२१–२२ या सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक व मेहनतान्यास मंजुरी देणे.
९. अहवाल सालात सभासद कल्याण निधीतून/जामिनहमी निधीतून केलेल्या मदत रक्कमेचा आढावा घेणे.
१०. वार्षिक सभेला गैरहजर असलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणेबाबत.
११. अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांना मंजुरी देणे.

ठिकाण : ठाणे **सही/–**
दि. १४/१०/२०२१ **(सौ. जयश्री शिरीन वैशंपायन)**
सचिव
ठाणे शहर पोलीस एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि., ठाणे

**टीप –**
१. गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर सभा घेतली जाईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२. ज्या सभासदांना सुचना करावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी दि. २७/१०/२०२१ रोजी पर्यंत संस्थेच्या कार्यालयात पाठवाव्यात, आयत्यावेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३. सदर सभा ही Zoom ॲपद्वारे ऑनलाईन होणार असल्याने सदर सभेस उपस्थित राहणेकरिता सभासदांनी Zoom ॲप डाऊनलोड करावे. सभेची लिंक पुढीलप्रमाणे http://tinv.cc/tcpolsocagm2021
४. कोविड–१९ च्या पार्श्वभूमीवर शासनाचे मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात येईल.
५. काही तांत्रिक कारणाने सदर वार्षिक सभेचे कामकाज खंडीत झाल्यास त्या त्रुटींचे निवारण झालेनंतर त्याच लिंकवर कामकाज लगेच पुढे सुरू करण्यात येईल. याची दक्षता घ्यावी.

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बां. विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील प्र.क्र.२७ (ब) व २७ (ड) "प्रभागसुधारणा निधी २०२१-२०२२" या लेखाशिर्षकां अंतर्गत पायवाट तयार करणे अशा ३ कामांकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुद्ध शासकीय/निमशाकीय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रदद करण्याची कार्यवाही केली/सुरू आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना व प्रपत्र संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर दि.२६.१०.२०२१ ते दि. ०९.११.२०२१ पर्यंत उपलब्ध असतील. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ वर दि. ०९.११.२०२१ रोजी सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदरची निविदा दि. १०.११.२०२१ रोजी १२.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-दिवा/७९५/२१-२२ **सही/-**
दि:२५.१०.२०२१ कार्यकारी अभियंता
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बां. विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील " प्रभागसुधारणा निधी" या लेखाशिर्षका अंतर्गत प्र.क्र. २८ (अ) मधील आगासन गावातील स्मशानभुमी रोड शंकर मंदीर जवळील परिसरात पायवाट करणेच्या कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुद्ध शासकीय/निमशाकीय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रदद करण्याची कार्यवाही केली/सुरू आहे,अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि.२६/१०/२०२१ ते ०९/११/२०२१ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.९/११/२०२१ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि. १०/११/२०२१ सायं. १६.०० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-दिवा/७९३/२१-२२ **सही/-**
दि:२५.१०.२०२१ कार्यकारी अभियंता
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

# करिअर



आजच्या काळात मोबाईल ही एक गरज बनली आहे. मोठमोठ्या शहरांपासून ते अगदी खेड्यापाड्यावरही मोबाईल वापरणारे लोक आहेत. मोबाईल हा इतका परवलीचा शब्द बनला आहे की, जणु याच्याशिवाय जगणे मुश्किल होईल. मोबाइलच्या वापरात भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. मोबाइलच्या किंमतीमधील घसरण आणि चांगले चांगले ॲप यामुळे ब्रण्डेड स्मार्ट फोन वापरणाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामतः गल्ली बोळामध्ये मोबाइल दुरूस्ती करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. साध्या फोनची दुरूस्ती करणारे सहज भेटतात परंतु जेंव्हा किंमती फोन दुरूस्त करण्याची वेळ येते तेंव्हा नाकी नऊ येतात. महाग स्मार्टफोन दुरूस्त करणाऱ्यांची संख्या फारच कमी आहे. तुम्ही यातील विशेष प्रशिक्षण घेऊन साध्या हॅण्डसेट सोबत जर महाग हॅण्डसेट दुरूस्त करण्याचे कौशल्य मिळवले तर निश्चितच तुमचे उत्पन्न वाढू शकते.


## कसे ओळखाल टॅलेंट?

▶ **योग्य प्रश्न विचारा :** आपली प्रतिभा ओळखण्यासाठी सर्वात पहिले पाऊल म्हणजे आपण स्वत:लाच काही प्रश्न विचारले पाहिजे. आपल्या बालपणाशी संबंधीत असलेल्या आठवणीशी संलग्न असलेले प्रश्न विचारावेत. बालपणी आपल्यासमोर अनेक गोष्टी आलेल्या असतात, मात्र त्यापैकी कोणत्या गोष्टी आपल्या मनावर, विचारावर प्रभाव टाकतात, हे पाहिले पाहिजे. त्यानुसार आपला कल कोणत्या दिशेने आहे, हे कळते. यासंबंधीत दुसरा प्रश्न असा आहे की, बालपणी आपले मन कशात अधिक रमले होते, याची उजळणी करणे गरजेचे आहे. आजही तिच गोष्ट किंवा कृती केल्यावर मनाला आनंद मिळतो का,याचा विचार करायला हवा.अशा कोणत्या घटना किंवा हालचाली आहेत की, त्या आपण एक लक्ष्य म्हणून त्याकडे पाहत नाही तर केवळ आनंद देत आहेत म्हणून त्याकडे पाहत आहोत. जर या प्रश्नाचे आपण प्रामाणिक उत्तर दिले तर समजावे की, आपल्याला टॅलेंटची दिशा सापडली असून त्याकडे वाटचाल करणार आहोत.

▶ **प्रतिभा आणि कौशल्यातील फरक :** प्रतिभा ही एक आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक आहे. कालांतराने हीच प्रतिभा आपली ओळख म्हणून सर्वांसमोर येते. एक वेळ अशी येते की, या टॅलेंटला आपण आपल्या अंगी असणाऱ्या कौशल्याचाच एक भाग समजू लागतो. जर एखाद्याला चित्र काढणे आवडत असेल आणि नृत्यही करत असेल तर आपल्याला वाटते की, नृत्य हे आपले टॅलेंट आहे. मात्र ते विकसित झालेले कौशल्य असते आणि आपण त्याला वेळोवेळी पारखत असतो. दुसरीकडे टॅलेंट किंवा प्रतिभा आपल्यात जन्मजात असते आणि ते आपल्या व्यक्तीमत्त्वाचा, स्वभावाचा एक घटक बनलेला असतो. मात्र त्याला विकसित होण्यासाठी आणि पारखण्याची गरज भासते. कौशल्य आणि प्रतिभा यांच्यातील फरक आपल्याला समजला की, आपण प्रतिभेचा विकास करण्यासाठी प्रयत्न करू लागतो.

> **आ**पली प्रतिभा (टॅलेंट) ओळखणे हा एक जीवनातील यशस्वीतेचा मूलमंत्र आहे. मात्र बहुंताशी लोक यापासून अनाभिज्ञ असतात. तसे पाहिले तर याचे प्रमुख कारण म्हणजे अनेक मंडळी आपले टॅलंट ओळखण्याची प्रक्रिया ओळखतच नाहीत. दुसऱ्यातील बुद्धीमत्ता किंवा हुशारी पाहून तीच हुशारी आपल्यामध्ये आहे, असे समजू लागतात. आपल्या प्रतिभेपासून ते पूर्णपणे दूर राहिलेले असतात. अशा काही टिप्स आहेत की, ज्या माध्यमातून आपण स्वत:चे टॅलेंट, बुद्धिमत्ता, हुषारी पारखू शकतो.

▶ **स्तुती पारखा :** बहुतांशी मंडळी एखाद्या व्यक्तीने केलेल्या



स्तुतीकडे, कौतुकाकडे लक्ष देत नाहीत. तसे पाहिले तर स्तुती किंवा कौतुक हे आपल्यासाठी छुपा संदेश असतो. तो आपली प्रतिभा ओळखण्यासाठी एक मार्ग असतो. आपल्याला कामातून, वागण्यातून, बोलण्यातून समोरच्या व्यक्तीकडून येणारी प्रतिक्रीया, स्तुतीचे अवलोकन करून त्यावर विचार केला पाहिजे. आपले वरिष्ठ सहकारी, मित्र, कुटुंब, शिक्षक किंवा कोणत्या ना कोणत्या मार्गाने भेटणारे अनोळखी लोक हे आपल्याला प्रतिभा ओळखण्यासाठी मदत करत असतात. आपण गिटार किंवा कोणतेही संगीत साहित्य वाजविण्यात निष्णात आहोत, असा जर समज असेल आणि प्रत्यक्षात आपली कामगिरी सर्वसाधारण असेल तर आपले मित्र, कुटुंबातील मंडळी हा समज दूर करून आपल्यातील प्रतिभा आणखी सुधारण्यासाठी मदत करू शकतात. त्यांची टीका किंवा स्तुतीला गांभीर्याने घेऊन आपल्यातील कच्चे दुवे करता येऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक प्रतिक्रिया गंभीरतेन घेणे आवश्यक आहे.

▶ **कृतीवर भर देणे :** जोपर्यंत आपण हातात गिटार घेत नाहीत तोपर्यंत आपण दुसऱ्याला गिटार ही आपली प्रतिभा आहे, हे सांगू शकत नाही. जर आपल्याला फुटबॉल पाहणे आवडत असेल तर प्रत्यक्षात फुटबॉलच्या मैदानावर आपण कसे आहोत, याची जाणीव कधीही होणार नाही. त्यासाठी आपल्याला स्वत:ला मैदानात उतरावे लागेल. आपल्याला केवळ टॅलेंटची ओळखायचे नाही तर ते पारखूनही घ्यायचे आहे. वाढत्या वयाबरोबर आपण काही गोष्टीबाबत पश्चाताप व्यक्त करू शकतो, की त्या आपण करू शकलो नाहीत. परंतु सगळीकडे पश्चातापाचा डांगोरा पिटणे योग्य नाही. विचार करण्यापेक्षा कृतीवर भर देणे कधीही योग्य ठरू शकते. आपल्याला स्वत:ची प्रतिभा तपासून घ्यायची असेल तर कृती करावी लागेल. केवळ चर्चा किंवा त्रयस्थ व्यक्तीप्रमाणे वर्तन उपयोगाचे नाही. पाण्याचा आनंद घ्यायचा असेल तर नदीच्या काठावर बसून नाही तर त्यासाठी पाण्यात उडी मारावी लागेल. हे प्रमाण प्रतिभा ओळखण्यासाठीही लागू पडते.

▶ **दबाव सहन करू नका :** आपली प्रतिभा ओळखताना आणि यश मिळवण्याच्या नादात आपण स्वत:वर खूप मोठा दबाव टाकत असतो. अनेक मंडळी एकाच वेळी अनेक गोष्टी करतात आणि करण्यासाठी प्रयत्नशीलही असतात. मात्र त्यात प्रतिभा सापडलेच याची खात्री देता येत नाही किंवा दिसतही नाही. प्रतिभा किंवा टॅलेंट आपली ओळख आणि व्यक्तिमत्त्वाचा एक भाग आहे. त्यामुळे या गोष्टी जबरदस्तीने बाहेर येणार नाहीत. प्रतिभा प्रकट होणे ही बाब स्वाभाविक आहे. त्यासाठी दोन गोष्टी महत्वाच्या आहेत, त्या म्हणजे आपला वेळ, ऊर्जा आणि उत्साहाकडे लक्ष द्या. तरच आपण आपल्यात दडलेल्या प्रतिभेला पारखू शकतो.

▶ **कन्फर्ट झोनमधून बाहेर या :** एकीकडे अनावश्यक दबावापासून आपण स्वत:ला वाचविणे गरजेचे आहे कारण स्वत: प्रतिभा योग्य रितीने ओळखू शकू. त्याचबरोबर आपण कन्फर्ट झोनमधून बाहेर पडणे गरजेचे आहे. आपल्याकडे प्रतिभा आहे म्हणून आपण सर्वश्रेष्ठ कामगिरी करतालच असे नाही. प्रतिभा ही नैसर्गिक असते आणि ती पारखता देखील आली पाहिजे. त्यासाठी मेहनत, कष्ट, संयम, चिकाटी अंगी असणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक आहे की, कन्फर्टझोनच्या बाहेर पडणे आवश्यक आहे आणि प्रतिभा ओळखण्यासाठी आणि पारखण्यासाठी यादृष्टीने प्रयत्न करावेत.

◆◆◆



> **मो**बाईलच्या वाढत्या वापरामुळे मोबाईल दुरूस्ती करणाऱ्यांची मोठी गरज भासत आहे. तुम्हाला मोबाईल दुरूस्ती करता येते पण त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर तुम्ही समाधानी नसाल तर महागड्या मोबाईलच्या दुरूस्तीचे प्रशिक्षण घेऊन तुम्ही आपले उत्पन्न वाढवू शकता.

## बना मोबाईल डॉक्टर

▶ **उत्तम प्रशिक्षणाची गरज :** प्रशिक्षणाशिवाय मोबाइल दुरूस्ती करता येऊ शकत नाही. मोबाइलमध्ये सामान्यतः की–पॅड, चार्जिंग, जॉयस्टिक, माइकरिंगर, स्पीकर, कॅमेरा, पॉवर स्वीच, टच स्क्रीन, डिस्प्ले स्क्रीन, नेटवर्क, ब्लू टूथ, सेट हँग असे बिघाड निर्माण होतात. यासाठी उत्तम प्रशिक्षणाची आवश्यकता असते. विशेषतः ब्रॅण्डेड मोबाइलच्या दुरूस्तीसाठी त्याचे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. कित्येक शहरांमध्ये आयटीआय आणि इतर खासगी संस्थामधूनही यासंबंधीचे प्रशिक्षण दिले जात आहे. दोन ते तीन महिने कालावधीचे सर्टिफिकिट कोर्सेस देखील आहेत. याबद्दलची अधिक माहिती जाणून घेण्यासाठी काही वेबलिंक्स पाहू शकता– इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्यूकेशन, दिल्ली, नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर एन्टरप्रेन्योरशिप अॅण्ड स्मॉल बिझनेस डेव्हलपमेंटख नोएडा, जीआरएएस अकादमी, आयटीआय करोल बाग नवी दिल्ली.



▶ **मोबाइल जाणून घ्या :** मोबाइल दुरूस्ती करण्यासाठी मोबाइलच्या प्रत्येक भागाची माहिती हवी. यासाठी तुम्हला मोबाइलच्या मदरबोर्डमध्ये बसवल्या गेलेल्या पार्टस्ची माहिती जाणून घेणे गरजेचे आहे. महाग असो किंवा स्वस्त परंतु मोबाइल दुरूस्तीपूर्वी मोबाइल मधील जे महत्त्वाचे घटक आहेत त्याबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. रेजिस्टन्स, क्वाइल, कंट्रोलर, फ्यूज, माइक हे मोबाइलमधील काही घटक आहेत. मोबाइलमधील हे घटक आणि त्यांची कार्यप्रणाली समजून घेणे अत्यावश्यक आहे.

▶ **खऱ्या पार्टस्चाच वापर करा :** मोबाइल दुरूस्ती करताना त्याचा बिघडलेला पार्ट बदलताना त्याच ब्रॅण्डचा अस्सल पार्ट वापरा. समजा जर मोटोरोला कंपनीचा मोटो जी मोबाइलचा स्पीकर बिघडला आहे. तर त्याच्या जागी नवा स्पीकर बसवताना तो त्याच कंपनीचा आहे याची खात्री करुन घ्या. त्याच कंपनीच्या स्पीकरसाठी तुम्हाला ३०० रूपयांचा खर्च येईल आणि ८० ते १०० रूपयांमध्ये लोकल स्पीकर मिळेल. परंतु तुम्ही खरे पार्ट वापरल्यामुळे तुमच्या कामाची कदर केली जाईल.

▶ **बिघाड कशा जाणून घ्याल :** मोबाइल फोनमध्ये दोन प्रकारच्या तक्रारी आढळतात. एक म्हणजे सॉफ्टवेअर आणि दुसरी हार्डवेअर. कोणतीही समस्या असली तरी पहिल्यांदा सॉफ्टवेअरकडे ध्यान द्या. समजा मोबाइलमध्ये रिंगटोनची तक्रार आहे तर पहिल्यांदा त्याचे सॉफ्टवेअर तपासा. प्रशिक्षणा दरम्यान जर तुम्ही नेमक्या तक्रारी कशा शोधायच्या असतात, हे जाणून घेण्यावर भर दिला असेल तर, काम करताना मोबाइल पाहताक्षणीच तुम्हाला कल्पना येईल की मोबाइलमध्ये नेमकी कोणती बिघाड आहे. यामुळे तुमच्या कामातील कौशल्य आणखी वाढेल.

▶ **काळासोबत चाला :** बदलत्या तंत्रज्ञानामुळे कामाच्या पद्धतीदेखील वेगाने बदलत आहेत. यानुसार आपली उपयुक्तता कायम राखण्यासाठी नवनवी कौशल्ये आत्मसात करा. त्यासाठी आपला उत्साह कायम ठेवा.

▶ **नेतृत्व गूण :** ऑफीसमधील तुमचे वर्तन हे सर्वांना सामावून घेणारे असायला हवे. यामुळे विरोध कमी होतो आणि ओळखी वाढतात.

▶ **काम करत प्रशिक्षण घ्या :** हॉटेल मॅनेजमेंट सारख्या क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी विशेष प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. परंतु काही वेळेस आपल्या अनुभवाच्या आधार घेणेही गरजेचे असते.

▶ **इतरांची मते ऐका :** मार्केटिंग, पीआर, कम्यूनिकेशन यासारख्या क्षेत्रांमध्ये काम करत असताना इतरांच्या मतांनाही प्राधान्य द्यावे लागते. कोणत्याही क्षेत्रामध्ये स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी संवाद कौशल्य असणे गरजेचे आहे. ◆◆◆

▶ **प्रत्येक ब्रॅण्ड समजून घ्या :** साधारणपणे सर्वच स्मार्टफोनमध्ये ऑपरेटिंग सिस्टिम, डिस्प्ले, टच स्क्रिन, ३जी/४जी, डबल सिम, एचडी डिस्प्ले, रॅम प्रोसेसिंग, जीपीएस नेव्हिगेशन, स्क्रीन रिजोल्यूशन, ॲक्टिव्हिटी ट्रॅकिंग, प्रोसेसर, कॅमेरा मेगापिक्सल, पॉवर बॅकअप असे एकसारखेच फिचर्स असतात. ब्रॅण्डेड मोबाइलमधील फिचर्स थोड्याफार फरकाने वेगळे असतात. काहींमध्ये ऑपरेटिंग सिस्टिम अँड्रॉइड २.० असते तर काहींमध्ये लॉलीपॉप किंवा किटकॅट असते. काही फिचर्स तर एकसारखेच असतात. सर्व फिचर्सची कार्यप्रणाली बारकाव्याने समजून घेता आल्यास यांना दुरूस्त करणे फारसे अवघड वाटणार नाही.

▶ **नोकारीमध्ये असलेली आव्हाने :** प्रत्येक कामामध्ये काही ना काही आव्हाने पेलावीच लागतात.काही महत्त्वाच्या गोष्टींची विशेष काळजी घेतल्यास ही आव्हाने पार करणे सोपे होऊ शकते.

▶ **उत्पन्न :** मोबाइल दुरूस्तीचा व्यवसाय करणारे सुधीर सांगतात की, पहिल्यांदा साध्या हॅण्डसेटच्या दुरूस्तीचे काम करत असताना महिन्याला १० ते १२ हजार रूपयांचा व्यवसाय व्हायचा. परंतु, ब्रॅण्डेड मोबाइलची दुरूस्ती करण्यास सुरूवात केल्यापासून २० ते २५ हजार रूपये महिन्याला कमावतो. कामात कौशल्य मिळवण्या बरोबरच ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण केल्यास तुमचे ध्येय गाठणे सोपे जाईल.

▶ **आवडेल तेच काम करा :** आपण कोणत्या क्षेत्रात काम करायचे यावर पूर्ण विचार करुनच निर्णय घ्या. जे काम करणार आहात ते मनापासून करा. कारण जे मनापासून उत्तम दर्जाचे काम करतात त्यांना कोणत्याच अडचणी येत नाहीत. परंतु, चालढकल करणारे लगेचच लोकांच्या नजरेत येतात. त्यामुळेच लवकरच त्यांची हकालपट्टीही होते.

▶ **मोबाइल दुरूस्ती शिकण्यासाठी घ्या ॲपची मदत :**



* मोबाइलची दुरूस्ती नेमकी कशी करावी? त्यातील तांत्रिक बाबी जाणून घेण्यासाठी मोबाइल ॲप किंवा युट्यूबवरील ट्यूटोरियल व्हिडीयोजची मदत घेऊ शकता.

* यूट्यूबवर सर्व नामांकित कंपन्यांच्या मोबाइल दुरूस्तीची व्हिडीओ पाहू शकता. कोणत्या कंपनीचे कोणते मॉडेल दुरूस्त करायचे आहे त्याचे नाव यूट्यूबवर शोधा. दररोज काही वेळ या व्हिडीयो पाहिल्यास मोबाइल दुरूस्तीच्या तुमच्या कौशल्यामध्ये निश्चितच भर पडेल.

* गूगल प्ले स्टोअर वरून मोबाइल रिपेरिंग ॲप डाउनलोड करुन घेऊ शकता. मोबाइल दुरूस्तीचे प्रशिक्षण घेत असताना याचा वापर केल्यास तुम्हाला याचा चांगला उपयोग होईल. भविष्यातही याचे अनेक फायदे तुम्हाला मिळतील.

▶ **बदलत्या तंत्रज्ञानाची माहिती :** मोबाइल फोनचे तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. दररोज नवेनवे सॉफ्टवेअर आणि फिचर्स येत आहेत. विशेषतः मोठमोठ्या कंपन्या प्रत्येक नव्या मोबाइलसोबत नवे तंत्रज्ञान आणि नवे फिचर्स आणत आहे. दररोज येणारे नवीन फिचर्स आणि तंत्रज्ञानाची माहिती घेऊन स्वतःला अद्यावत ठेवा. मोबाइल ऑपरेटिंग सिस्टिम देखील वेगाने बदलत आहे. बहुतेक स्मार्टफोनमध्ये अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टिम असते. तर काही मोबाइलमध्ये ॲपल आयओएस, मायक्रोसॉफ्टमध्ये विंडोज ॉपरेटिंग सिस्टिम आहेत. सुरूवातीला अँड्रॉइड २.० होता परंतु आता काही नविन व्हर्जन आले आहेत.

## कचरा व्यवस्थापनातील करिअर

> भारतात ई–वेस्टचे प्रमाण वाढत चालले आहे आणि त्याचे रिसायकलिंग करण्याबाबत जागरुकता वाढत चालली आहे. देशात वेगाने वाढणाऱ्या 'वेस्ट ट्रिटमेंट' एजन्सीमुळे कचरा व्यवस्थापन क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी वाढत चालल्या आहेत. या क्षेत्राशी बंधीत आपण चांगले करियर करण्याबरोबरच स्वच्छ पर्यावरण राखण्यासाठी योगदान देऊ शकतात. कारखान्यातून बाहेर पडणारा कचरा, भंगार सामान, तसेच घरातील निरोपयोगी वस्तू फेकून देण्याच्या सवयीमुळे पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात हानी पोचते. पर्यावरणातील प्रदूषण कमी करण्यासाठी यावर पुर्नप्रक्रि या करून खराब झालेली किंवा फेकून दिलेली वस्तू पुन्हा उपयोगात आणली जाते. निरोपयोगी, बेकार वस्तूंना पुन्हा नव्याने रुप देण्याच्या प्रक्रियेला वेस्ट मॅनेजमेंट असे म्हटले जाते. वेस्ट मॅनेजमेंट पर्यावरण प्रबंधक आणि संरक्षणाचा एक आधारस्तंभ मानला जातो. त्यानुसार पर्यावरण विज्ञान किंवा पर्यावरण संरक्षणाशी संबंधित काही प्रमुख क्षेत्रात काम करता येऊ शकते. सध्या भारतात घरातील निरोपयोगी वस्तूंध्ये केवळ तीस टक्के रिसायकल करण्याची क्षमता आहे. त्यातील बहुंताशी वाया गेलेले साहित्य इलेक्ट्रॉनिक तसेच प्लास्टिकचा समावेश आहे. आता तर वेस्ट मॅनेजमेंट व्यवसाय तेजीत आहे. मुंबईतील धारावी, उत्तरप्रदेशचे मुरादाबाद आणि दिल्लीचे मुंडका याचे प्रमुख केंद्र मानले जाते. देशातील तेजीने वाढणाऱ्या वेस्ट ट्रिटमेंट एजन्सीमुळे या क्षेत्रात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.



**क**चरा व्यवस्थापन केवळ वापरात नसलेल्या वस्तूंचा पुन्हा उपयोग कसा करावा याची माहिती देत नाही तर व्यवसायिक पातळीवर स्थिरस्थावर हाण्यासाठी अनेक प्रकारचे कौशल्यही शिकवले जाते. या क्षेत्रात करियर करण्यासाठी पर्यावरणाबाबत आस्था असणे खूपच गरजेचे आहे. प्रारंभी विद्यार्थ्यांना या गोष्टी बेकार वाटतील, मात्र कालांतराने विद्यार्थ्यांमध्ये जसजशी रुची वाढेल तसतशी या वेस्ट मॅनेजमेंटचा चांगला लाभ घेता येऊ शकेल. कचरा व्यवस्थापनाचे पूर्ण कार्यक्षेत्र हे पर्यावरण शास्त्र किंवा त्यासंबंधी असणाऱ्या विषयाभोवती व्यापलेले आहे. पर्यावरण संरक्षणासंबंधी कार्य विज्ञान किंवा अभियांत्रिकीच्या विविध सिद्धांतावर आधारलेल्या प्रयोगातून पुढे जात असते. वातावरणातील प्रदूषण दूर करण्यासाठी शास्त्रज्ञ अनेक प्रकारचे संशोधन, प्रबंध तसेच उपक्रम राबवताना दिसून येतात. अर्थात कचरा व्यवस्थापन प्रक्रियेत पर्यावरण शास्त्राचे कार्य हे रिसर्च ओरिएंटेड आहे. त्यात प्रशासकीय यंत्रणा, सल्लागार तसेच संरक्षण अशा तीन स्तरावर काम करावे लागते. कचरा व्यवस्थापन संबंधी वेगळा असा अभ्यासक्रम देशात उपलब्ध नाही.

कचरा व्यवस्थापनाला बहुतांशी पर्यावरण विज्ञानाच्या अभ्यासक्रमात एक विषय म्हणून समावेश केला आहे. त्यात तीन वर्षाचा बॅचलर कोर्स बीएससी, बीई इन एन्वायरमेंटल सायन्स तसेच दोन वर्षाचा मास्टर्स कोर्स एमएससी, एम.टेक इन एन्वायरमेंटल सायन्स उपलब्ध आहे. बीएसएसी तसेच बीईमध्ये प्रवेश विज्ञान विषयासह बारावीनंतर मिळतो. त्यासाठी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. त्याचरोबर एमएससी आणि एमटेकमध्ये प्रवेश एन्वायरमेंटल सायन्समध्ये बीएससी किंवा बीटेक केल्यानंतर पदवी मिळते. काही संस्थेत एम.फील तसेच पी.एचडी कोर्सही उपलब्ध आहेत. कचरा व्यवस्थापनात एक वर्षाचा पदव्युत्तर डिप्लोमा कोर्सही केला जावू शकतो. कचरा व्यवस्थापनात प्रारंभीच्या काळात प्रोफेशनल्सना २० ते २५ हजार दरमहा वेतन सहजपणे मिळू शकते. जसजसा अनुभव वाढत जाईल तसतसे वेतनही वाढतच जाईल. दोन वर्षांनंतर अनुभव आल्यानंतर हे वेतन ३५ ते ४० हजारांपर्यत पोचलेले असेल.



### प्रमुख संस्था

- इंडियन इंन्स्टिट्यूट ऑफ एन्वायरमेंटल मॅनेजमेंट, मुंबई
- इंटरनॅशनल इंन्स्टिट्यूट ऑफ वेस्ट मॅनेजमेंट, भोपाळ
- डॉ.राम मनोहर लोहिया अवध विद्यापीठ, फैजाबाद
- गुरू जंभेश्वर यूनिर्व्हसिटी, हिस्सार
- राजस्थान विद्यापीठ, जयपूर
- गुरु गोविंद सिंह इंद्रप्रस्थ विद्यापीठ, नवी दिल्ली.

◆◆◆

# जलवाहिनी दुरुस्ती, रिमॉडेलिंगची कामे जलदगतीने पूर्ण करा

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश



**ठाणे: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य जलवाहिनी दुरुस्तीसाठी घेण्यात येणाऱ्या शटडाऊनचा कालावधी कमी करून एमआयडीसी व महापालिका प्रशासनाने समन्वय साधून येत्या मार्च अखेर दुरुस्ती व रिमॉडेलिंग प्रकल्पाची कामे जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.**

दरम्यान दिवा-मुंब्रा परिसरात सुरु असलेल्या विविध कामांचा आज खासदार श्रीकांत शिंदे यांनी आढावा घेवून ही सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यात यावीत तसेच दर आठवड्यानी झालेल्या कामाचा आढावा घेण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

ठाणे महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व महापौर नरेश म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा, क्रीडा व समाजकल्याण सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या सभापती प्रियांका पाटील, दिवा प्रभाग समितीच्या अध्यक्षा सुनिता मुंडे, माजी उपमहापौर तथा स्थानिक नगरसेवक रमाकांत मढवी, नगरसेवक उमेश पाटील, राजेंद्र साप्ते, शैलेश पाटील, अमर पाटील, दिपक जाधव, नगरसेविका दर्शना म्हात्रे, पूजा करसुळे, अंकिता पाटील, दीपाली भगत, अतिरिक्त आयुक्त (1) संदीप माळवी, नगरअभियंता अर्जुन अहिरे, एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी तसेच महापालिकेचे कार्यकारी अभियंता आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरु टप्याटप्याने सुरु आहे. यासाठी घेण्यात येणाऱ्या नियोजित शटडाऊन नंतर वारंवार ब्रेक डाऊन झाल्यामुळे दिवा परिसरात अनियमीत पाणी पुरवठा होत आहे. याबाबत आज खासदार डॉ. शिंदे यांनी एमआयडीसीचे व महापालिका प्रशासन यांची समवेत बैठक घेवून संपूर्ण कामाचा आढावा घेतला.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जलवाहिनी दुरुस्तीसाठी घेण्यात येणाऱ्या शटडाऊनचा कालावधी कमी करून दोन्ही विभागाने समन्वय साधून विविध ठिकाणी अर्धवट अवस्थेत असलेल्या पाईपलाईन दुरुस्तीची सर्व कामे येत्या मार्च अखेर काम पूर्ण करण्याचे निर्देश संबंधितांना दिले.

या बैठकीमध्ये खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिवा विभागातील इतर विविध कामांचा आढावा घेतला. यामध्ये दिवा-मुंब्रा रस्त्याचा डी.पी.आर तयार करणे, बांधून तयार असलेले जलकुंभ कार्यान्वित करणे आदी कामे तात्काळ करणेबाबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच दिवा-शिळ रोड, दिवा-आगासन रोड, दिवा बायपास, दातिवली रस्ता, साबे रोड,रेल्वे ओव्हर ब्रीज आदी रस्त्यांची कामे जलदगतीने व्हावीत या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करण्याचे निर्देशही खासदार डॉ. शिंदे यांनी दिले. तसेच या सर्व कामांचा आढावा घेण्यासाठी दर आठवड्याला बैठक घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या आहेत.

शहरातील दिवा परिसर महत्वाचा भाग असून या विभागाच्या सर्वांगीण विकासाबाबत सदर बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली व सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश महापौर नरेश म्हस्के व महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे मंजूर असणाऱ्या क्षमतेचा रीतसर पाणीपुरवठा ठाणे महापालिकेस करण्याच्या सूचनाही महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी संबंधित एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

# कडोंमपासह राज्यात निवडणुका महाविकास आघाडी सोबतच-जयंत पाटील

## कल्याणात राष्ट्रवादीच्या जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन



**कल्याण : येत्या कल्याण डोंबिवली महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस महाविकास आघाडी होईल का? या प्रश्नावर उत्तर देताना पाटील यांनी आम्ही एकत्र सरकारमध्ये काम करतोय, एकत्र सरकारमध्ये राहायचं आणि वेगळं वागायचं अस आमचं धोरण नाही, महाविकास आघाडीमधील पक्ष जिथे जिथे एकत्रीत राहतील त्याला प्राधान्य देऊ असे उत्तर जयंत पाटील यांनी दिले.**

राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष व जलसंपदा मंत्री जयंत पाटील सोमवारी कल्याणात जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन व कार्यकर्ता मार्गदर्शनासाठी आले होते त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी गृहनिर्माण महाराष्ट्र राज्य मंत्री जितेंद्र आव्हाड, राष्ट्रवादी कल्याण जिल्हा अध्यक्ष जगन्नाथ शिंदे, प्रदेश प्रवक्ता महेश तपासे, जिल्हा कार्याध्यक्ष वंडार पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पप्पू कलानीबाबत पत्रकारांनी जयंत पाटील यांना प्रश्न विचारले असता, त्यांनी सांगितले की, त्यांच्या समाजाचा सण होता, त्यानिमित्ताने त्यांना भेटलो आणि जेवण केले. राजकरणाबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे पाटील सांगितले. दरम्यान कार्यालयाच्या उद्घाटनासाठी आलेल्या मंत्री आणि पदाधिकाऱ्यांच्या गर्दीमुळे कल्याणकर नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागले. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज चौकातून स्टेशनकडे जाण्यासाठीचा सरळ मार्ग काही काळ थांबवून तो सहजानंद चौकातून पुन्हा महाराज चौकातून स्टेशन परिसरात वळवण्यात आली होती. त्यामुळे नगरीकांनी संताप व्यक्त केला.

**एकेकाळी कल्याण-डोंबिवली महापालिकेत राष्ट्रवादीचा महापौर होत. मधल्या काळात अनेक घटना घडल्या. आता अप्पा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम सुरू आहे. त्यामुळे पुन्हा उभारी येईल असे त्यांनी सांगितले. कल्याण-डोंबिवलीच्या रस्त्याची दुरवस्था झाली. दुरावस्थेमुळे अनेक अपघातही घडले. याला तत्कालीन सरकार जबाबदार आहे. या रस्त्यांना प्राधान्य देऊ आणि ते प्रश्न सोडवू असे पाटील म्हणाले.**

# बांधकामांसाठी अनधिकृतपणे पाणी वापरणाऱ्यांवर कारवाई करणार

**ठाणे: नव्याने गृहसंकुले उभारण्याचे काम करणाऱ्या बांधकामांचे पाणी कमी करण्याच्या सुचना देतांनाच जे अनधिकृतपणे बांधकामांसाठी पाणी वापरत असतील त्यांचे पाणी बंद करा असे आदेश कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ठाणे महापालिका अधिकाऱ्यांना दिले आहे.**

सोमवारी ठाणे महापालिकेच्या मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात शिंदे यांच्या उपस्थितीत आढाव बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला महापौर नरेश म्हस्के, महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांच्यासह कळवा, मुंब्रा आणि दिव्याचे नगरसेवक, पालिकेचे अधिकारी तथा एमआयडीच्या पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी शिवसेनेच्या नगरसेविका अनिता गौरी यांनी इथे नागरीकांना पाण्याच्या झळा सहन कराव्या लागत असतांना दुसरीकडे नव्याने सुरु असलेल्या गृहसंकुलांच्या बांधकामांना मात्र टँकर न जाता, पालिकेचे पाणी कसे जाते असा सवाल उपस्थित केला. वास्तविक पाहता, त्यांना टँकरचे पाणी देणो अपेक्षित असून पालिकेचे पाणी नागरीकांना वळते करण्याची मागणी त्यांनी केली. त्यावर पाण्याची ही समस्या केवळ कळवा, मुंब्रा किंवा दिव्यापुर्ती मर्यादीत नसून संपूर्ण ठाण्याची असल्याची कबुली आयुक्त शर्मा यांनी दिली. त्यानुसार अशा बांधकामांची माहिती घेण्याचे आदेश त्यांनी पाणी पुरवठा विभागाला दिले.

दरम्यान या संदर्भात खासदार शिंदे यांनी जे परवानगी घेऊन पालिकेचे पाणी वापरत असतील त्यांचे पाणी तुर्तास पाण्याची टंचाई लक्षात घेऊन त्यांचे पाणी कमी करण्यात यावे, शिवाय जे पालिकेचे परवानगी न घेता पाणी उचलत असतील त्यांचे पाणी बंद करावे असे आदेश दिले. त्यानुसार याची महिती घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे आश्वासन नगरअभियंता अर्जुन अहिरे यांनी दिले.

# लोकमान्यनगरमध्ये सरकारी जागेवर गर्दुल्ले-मद्यपी यांचा वावर

## पोलीस उपायुक्तांनी स्थानिक नगरसेवकांशी साधला संवाद



ठाणे: वर्तकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिसरात असलेल्या लोकमान्यनगर येथील सरकारी जागेवर मद्यपी आणि गर्दुल्ल्यांचा वावर वाढल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत पोलीस उपायुक्त विनय राठोड आणि स्थानिक नगरसेवक यांच्या समन्वयाने स्वर्गीय रामचंद्र जनार्दन ठाकूर सामाजिक हॉल या ठिकाणी शुक्रवारी पोलीस अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी जनतेशी संवाद साधला. यावेळी पोलीस उपायुक्त राठोड यांनी महिलांची छेडछाड व भाईगिरी यापुढे चालू देणार नसल्याचा विश्वास दिला. यासाठी जादा पोलीस बंदोबस्त देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वर्तक रनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या लोकमान्यनगर 1 ते 4 याठिकाणी असलेल्या सरकारी जमिनीवर चरस, गांजा आणि दारूचा अड्डा झालेला असून या जागेवर मोठ्या प्रमाणात नशापान करणाऱ्या मद्यपी आणि गर्दुल्ल्यांचा वावर वाढला आहे. हे गर्दुल्ले महिलांची छेडछाड करतात. तसेच शस्त्र घेऊन विभागात दहशत माजवत आहेत यामुळे लोकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत वर्तकनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली असता पोलीस कर्मचारी घटनास्थळी येऊन नागरिकांनाच विचारणा करतात. त्यामुळे नागरिकांना शिवीगाळ-दमदाटी केली जाते.

सदर प्रकरणी स्थानिक नगरसेवक यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर 22 ऑक्टोबर रोजी रामचंद्र ठाकूर समाज मंदिर हॉल या ठिकाणी स्थानिक नगरसेवक हणमंत जगदाळे यांच्या पुढाकाराने नगरसेविका राधाबाई जाधवर, वनिता घोगरे आणि नगरसेवक दिगंबर ठाकूर यांच्या माध्यमातून पोलीस उपायुक्त विनय राठोड, सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश सोनावणे आणि वर्तक नगर पोलीसचे ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदाशिव निकम यांनी जनतेशी संवाद साधला. यावेळी बोलताना स्थानिक नगरसेवक माजी विरोधी पक्षनेते हनुमंत जगदाळे यांनी सांगितले की वर्तक नगर पोलीस ठाण्यात याबाबतची तक्रार करण्यात आली असून पोलीस बैठकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करतील. विभागामध्ये पथदिवे आणि सीसीटीव्ही कॅमेरे महानगरपालिकेच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येतील, असे जगदाळे यांनी आश्वासन दिले. नुकत्याच झालेल्या पालिकेच्या महासभेत या प्रश्नावर सभागृहात बोललो असून आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वासही जगदाळे यांनी दिला.



ठाणे महापालिका प्रभाग क्र. 8 मधील माजिवडा भागात विकास कामांच्या माध्यमातून सुरु असलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी यासाठी मनसेचे प्रभाग अध्यक्ष सचिन कुरेल यांच्या नेतृत्वाखाली माजिवडे येथील भारतमाता मैदानात भ्रष्टाचारी रावण उभारून मनसेच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात आले.

# अभिनय कट्ट्यावर वाजली पुन्हा एकदा तिसरी घंटा




**ठाणे: आदित्य प्रतिष्ठान ठाणे ही संस्था गेली 22 वर्षे कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून गेली 11 वर्षे अभिनय कट्टा दर रविवारी सातत्याने सुरु आहे. या कोरोनाकाळातील जवळपास पावणेदोन वर्षाच्या व्यत्ययानंतर रविवारी पुन्हा एकदा अभिनय कट्ट्यावर तिसरी घंटा वाजली.**

अभिनय कट्ट्यावरील संभाजी आंद्रे यांनी तिसरी घंटा वाजवली. नाट्य मालिका अभिनेते सुनील गोडसे यांच्या हस्ते नटराजाचे पूजन करण्यात आले. ज्येष्ठ साहित्यीक डॉ.र.म. शेजवलकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले. सुप्रसिध्द अभिनेते संदीप जुवाटकर, गणेश जेठे, जेष्ठ रंगभूषाकार दीपक लाडेकर, माजी ज्येष्ठ नगरसेवक भास्कर पाटील, दिव्यांग विद्यार्थी आरती गोडबोले, वुई आर फॉर यू चे विजय डावरे व संचालक किरण नाकती यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. हरिष सुतार या संगीत कट्ट्याच्या गायकाने गणेशवंदना म्हणत सादरीकरणाला सुरुवात केली व संपूर्ण वातावरण प्रसन्न झाले.

इरावती कर्णिक यांच्या दोघी या कथेचे अभिवाचन राजश्री गढीकर यांनी केले. अभिनय कट्ट्याचा बाल कलाकार चिन्मय मौर्य याने विनोदी एकपात्री सादर केली. शिवम सुळे या सहा वर्षाच्या चिमुकल्याने अगंबाई ढगूबाई हे गाणं म्हंटले. डॉ र. म. शेजवलकर, सई कदम, गणेश जेठे, आदित्य नाकती, परेश दळवी यांनी विविध कवितांचे वाचन करुन काव्य मैफल रंगवली. राजन मयेकर व आदित्य कदम यांनी पुनश्च हरिओम ही द्विपात्री प्रयोग सादर केला.

अभिनय कट्ट्याच्या शोध कलाकारांचा या एका नवीन उपक्रमाच्या पोस्टरचे अनावरण 'ठाणेवैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. फुग्यांच्या मागे दडलेल्या या पोस्टर वरील फुगे फोडत अभिनव पध्दतीने हे अनावरण करण्यात आले. शोध कलाकारांचा या उपक्रमाच्या संदर्भात अधिक महितीसाठी 8451054548 या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संगीत कट्याचे विनोद पवार व अनंत मुळे यांनी सुध्दा आपल्या गाण्यांची उपस्थित प्रेक्षकांना खुश केले. दिव्यांग कला केंद्राच्या पार्थ खडकबाण यांने जोगवा नृत्य सादर करीत प्रेक्षकांची मने जिंकली. निवेदन माधुरी कोळी यांनी केले. त्याचप्रमाणे या विशेष कट्ट्याचे औचित्य साधून वुई आर फॉर यू व नौपाडा युथच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या बाप्पा आपला या गणेशोत्सव घरगुती सजावट, आरती गायन व सेल्फी विथ बाप्पा या स्पर्धेचा बक्षीस समारंभ मान्यवरांच्या हस्ते पार पाडण्यात आला.

किरणने या जागेचा अतिशय सुंदर उपयोग केला व त्याचं सोनं केलं. जे लोक कट्टयावर आहेत आणि करिअर घडली आहेत त्यांचे मी अभिनंदन करतो. इथे आलेला माणूस चांगला कलाकार होतोच, भले कलाकार झाला नाही तरी एक उत्तम प्रेक्षक होतो, याची मला खात्री आहे. त्या पद्धतीचं काम किरण करतोय. किरणच्या माध्यमातून ठाणेकरांची वेगळ्या पद्धतीने सेवा सुरू आहे. ती सेवा अशीच निरंतर सुरु राहो, अशा शुभेच्छा मिलिंद बल्लाळ यांनी दिल्या.

# नो पार्किंगमधील पोलिसांच्या गाड्यांवर कारवाई



कल्याण : कल्याण स्टेशन परिसरात स्मार्ट सिटी प्रकल्पाचे काम सुरु आहे. नो पार्किंगचा फलक लावून सुद्धा या ठिकाणी गाड्या पार्क केल्या जात आहेत. विशेष म्हणजे पोलिसांच्या गाड्यांचा समावेश मोठ्या प्रमाणात असतो. आज कल्याण वाहतूक पोलिसांनी पोलिसांच्याच गाड्यांच्या विरोधात कारवाईचा बडगा उगारत 100हून अधिक पोलिसांच्या गाड्यांवर कारवाई करण्यात आली.

कल्याण स्टेशन परिसरात स्मार्ट सिटी अंतर्गत स्टेशन परिसर विकासाचे काम सुरु आहे. या ठिकाणी वाहतूक कोंडी होते. ही वाहतूक कोंडी सोडविण्याचे काम वाहतूक पोलीस करीत असतात. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रिक्षा चालक आणि नो पार्किगमध्ये बेशिस्तपणे उभ्या केलेल्या दुचाकीमुळे नाहक त्रास सहन करावा लागतो. विशेष म्हणजे नो पार्किगमध्ये उभ्या केलेल्या गाड्यांत पोलीस आणि वकिलांच्या गाड्या जास्त असल्याने या गाड्यांच्या विरोधात कारवाई करताना पोलिसांसमोर पेच निर्माण होतो. यासंदर्भात वारंवार तक्रारी केल्या जात होत्या.

कल्याणच्या वाहतूक पोलिसांनी या बेशिस्त गाड्या पार्किगवर कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक सुखदेव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्टेश□ परिसरात नो पार्किग झोनमध्ये उभ्या असलेल्या गाड्यांच्या विरोधात मोठी कारवाई केली गेली. यामध्ये 100 हून अधिक पोलिसांच्या गाड्यांच्या विरोधात इ चलानच्या माध्यमातून कारवाई केली आहे. या पुढे गाड्या उभ्या करुन अडथळा निर्माण करु नये, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात दिवसभारत ४२ हजार नागरिकांचे लसीकरण



ठाणे: कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेत ठाणे जिल्ह्यात कोविन पोर्टलवरील नोंदीनुसार आज रात्री आठपर्यंत 42 हजार 421 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले.

जिल्ह्यात आतापर्यंत एकूण 80 लाख 49 हजार 19 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले असून त्यापैकी 53 लाख 95 हजार 408 नागरिकांना पहिल्या डोसचे तर 26 लाख 53 हजार 611 नागरिकांना दुसरा डोस देण्यात आला आहे. आज दिवसभरात लसीकरणाचे सुमारे 496 सत्र आयोजित करण्यात आले.

